पुणे, किशोर–वर्ष ५२, अंक ११ वा, डिसेंबर २०२३ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.52, Issue 11, December, 2023 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

डिसेंबर २०२३



# भाऊराया

वा. रा. गोडबोले

माझा गं भाऊराया
दिसतो गोरा छान
जणू केवड्याचे पान
सुवासिक
माझा गं भाऊराया
हातपाय त्याचे सान
नाक, डोळे आणि कान
इवले इवले
माझा गं भाऊराया
तोंडी नाही त्याच्या दात
सदा हलवी पाय हात
आनंदाने
माझा गं भाऊराया
पायी शोभे त्याच्या वाळा
हाती धरूनि खुळखुळा
वाजवितो
माझा गं भाऊराया
मांडीवरी घेते त्याला
हात लाविता गं गाला
हसू लागे
माझा गं भाऊराया
किती हसतो गोडगोड
सारे करिती त्याचे लाड
कौतुकाने
माझा गं भाऊराया
भूक लागता गं रडतो
पोट भरता झोपून जातो
शांतपणे



संपर्क : ०२०-२५२३२०६३

डिसेंबर २०२३, वर्ष ५२ वे, अंक ११ वा, कार्तिक-मार्गशीर्ष, शके १९४५

# किशोर

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जालिंदर पाटील

**मुखपृष्ठ पेंटींग**
सदानंद धनवडे
संपर्क : ९८२२०३५३११

**चित्रांकन :**
चारूहास पंडित, घनश्याम देशमुख, माईंडईट संवाद, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, गणेश ढवळे, जैत्र डिजिटल, मयुरी दिवाळकर, योगिता धोटे, अमृता ढगे

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| भाऊराया | वा. रा. गोडबोले | ०२ |
| कडजी | आबा गोविंदा महाजन | ०६ |
| नजराणा | डॉ. नीलिमा गुंडी | ११ |
| उखाणेबाज रामभरोसे | श्रीकांत बोजेवार | १२ |
| गोष्ट आर्थिक साक्षरतेची | सुधीर साबळे | १६ |
| संत गाडगेबाबा | सुचिता कुलकर्णी-जोशी | १९ |
| पकडून ठेवणारे भूत | डॉ. रसिका ठोसर | २० |
| हिवाळ्याचे हिव | भानुदास धोत्रे | २३ |
| कल्पना व कौशल्याची झेप | रेणू दांडेकर | २४ |
| जंगल | अनुज केसरकर | २६ |
| धाडसी रोहन | दिलीप फलटणकर | २८ |
| गुरुजी ते सर | मनोज बोरगावकर | ३० |
| सप्तरंगी आशा | प्रभाकर साळेगावकर | ३३ |
| ढगू | ऐश्वर्य पाटेकर | ३४ |
| कुतूहल | अमित डहाणे | ३८ |
| **बालविभाग** | | |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| जंगल एक्सप्रेस | हेमंत जोशी | ४६ |
| **ENGLISH SECTION** | | |
| My Unique Journey | Sarvagya Patil | ४७ |
| Puzzle | | ५० |


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

## प्रिय किशोर

'किशोर'आहे बालमनाच्या
अंतर्मनाची खास 'पर्वणी'
कविता, गोष्टी, लेख वाचुनी
होते सुमनांची पेरणी ।।धृ ।।
पाहत असती आतुरतेने, बाळगोपाळ
वाट तयाची नेहमी
सुजाणगोष्टी सांगून जातो
कधी आणतो डोळ्यांत पाणी ... ।।१।।
कधी विज्ञान, कधी निसर्ग, तर
कधी चढवतो भातुकलीचा साज
बालमनाचा ठाव घेऊनी
होतो त्यांच्या मनातला 'नाज' .....।।२।।
गप्पागोष्टी करत करत किशोर
शिक्षण देतो उच्च प्रतीचे
मनामनांत साठवून ठेवतो
गुज तयाच्या अप्रूपतेचे ......।।३।।
केले घर मनामनात, हो आहे
'किशोर' आमचा लाडका
समजून उमजून लेखन करतो
देतो ज्ञानाचा तडका ....... ।।४।।

तानाजी धरणे
संपर्क : ९९७५३७०९१२

# सरत्या वर्षाला निरोप देताना...

हितगुज

मित्रांनो, डिसेंबर महिना सुरू झाला आहे. या वर्षाला निरोप देण्याची तयारी सुरू झाली आहे. अशावेळी मागील वर्षाचे गणित आपण मांडत असतो. आनंदाच्या-दुःखाच्या क्षणांचा आढावा घेतो. सुखाच्या क्षणांची बेरीज करतो तर दुःखाच्या क्षणांना वजाबाकीत ढकलतो. पण खरंतर असे गणित मांडून सरत्या वर्षाला निरोप द्यायचा की, मागील वर्षात आलेला प्रत्येक अनुभव काहीतरी नवीन शिकवून गेला म्हणून त्याकडे सहजतेने, तटस्थतेने पहायचे हे आपल्यावर अवलंबून आहे. दिवस-महिने-वर्ष सरणे आणि नव्या वर्षात पदार्पण करणे हे न चुकणारे निसर्गचक्र आहे. आपणही या निसर्गाचाच एक भाग आहोत. त्यामुळे बदल होतच राहणार. ग्रीष्मात वाळून गेलेल्या झाडाला देखील वर्षा ऋतूत जशी पालवी फुटते तसेच नाते सुख-दुःखाचे आहे. अशावेळी फक्त जमिनीत घट्ट मुळं रोवून उभं राहणं महत्त्वाचं आहे. या वर्षात आलेले काही अनुभव इतके सुंदर असतील की, त्यांचा सुगंध भविष्यात देखील दरवळणार आहे. तर काही कटू अनुभव हा एक मिळालेला धडा म्हणून सोडून देता यायला हवेत. पण हे सारं खूप सहज घडायला हवं. कळीतून फूल उमलतं ना, इतकं सहज. निसर्ग कधी थांबत नाही. तो आपले कार्य करीतच राहतो. आपणही थांबू नये. कार्य करीतच रहावे. आपण पुढे जात असतांना आपल्या हातून नकळतपणे काही चुका घडत असतात. त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा. अनेकदा खूप प्रयत्न करूनही यश मिळत नाही. अशावेळी निराश न होता पुन्हा नव्या जोमाने नव्या दिशेने प्रयत्न करावेत. पण कधीही धीर सोडू नये. अपयशाला मात देता येते हे पक्के ध्यानात ठेवा. सरत्या वर्षात मनासारख्या न झालेल्या गोष्टी नव्या वर्षात पूर्ण करता येतील. नवीन कल्पना, नवे विचार यांचे सतत स्वागत करायला शिका. जुन्या विचारातील चांगले सोबत घेताना जे कालबाह्य आहे ते टाकून द्यायला शिका. त्याला चिकटून राहू नका.मोबाईल फोनमध्ये जसे विविध ॲप्स् (ॲप्लिकेशन्स) सतत अपडेट करावे लागतात तसेच आपलेही आहे. बदलत्या काळासोबत सतत स्वतःला अपडेट करायला शिका. नुसता काळ बदलून काही होत नाही. विचार बदलले तरच समाज बदलतो. त्यामुळे सकारात्मक, आनंददायी बदलांचे कायम स्वागत करा. या वर्षात आपल्या आचारात आणि विचारात सकारात्मक बदल कसे होतील याचा ध्यास घ्या. उद्या नवा दिवस उगवणार आहे आणि तो अधिक सुंदर, अधिक प्रसन्न असणार आहे ही उमेद मनात कायम ठेवत सरत्या वर्षाला आनंदाने सप्रेम निरोप देऊया. आणि त्या सोबतच सामाजिक भान जपणे ही आपली जबाबदारी आहे याची जाणीव मनात ठेवत आपला प्रवास या सुंदर कवितेच्या ओळींना गुणगुणत सुरू ठेऊयात..

**चला उधळू प्रकाश**
**अंधार दाटलेल्या गावी**
**एक पेटवू दिवा**
**जिथे कुणी जात नाही.**

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

आबा गोविंदा महाजन

# कडजी



ही गोष्ट तुम्हांला सांगू का नको? असा बराच वेळ विचार केला. खूप चिंतन केलं. एक मन म्हणायचं, नकोच सांगायला. उगाच कशाला स्वत:हून आपलं हसू करून घ्यायचं; तर मग दुसरं मन म्हणायचं, सगळं सांगून मोकळं झालेलं केव्हाही बरं. सांगितलं तर बिघडलं कुठं? कुठलाही आडपडदा न ठेवता सांगता आलं पाहिजे. म्हणजे स्वभावच तसा असावा प्रत्येकाचा, जे आहे ते असं आहे. रोखठोक. बिनधास्त. एका मनानं दुसऱ्या मनाला पटवून सांगितलं. शेवटी पटलं. आता मी गोष्ट सांगायला मोकळा. म्हणून सांगतोय ही गोष्ट...

...तर गोष्टीची सुरुवात होते ती कडजीपासून. आता तुम्ही म्हणाल की, कडजी म्हणजे काय? तर कडजी म्हणजे एका गावाचं नाव. खेडे गाव. हजार, बाराशे-तेराशे वस्तीचं असेल. पारोळ्याजवळ. हायवेवर. तर त्या गावाहून अनाहूतपणे आलेल्या एका पोराची आणि माझी ही गोष्ट.

...तर झालं असं की, तो पोरगा आमच्या गल्लीत आला. म्हणजे राहायला आला. कायमचा. म्हणजे तसा तो मूळ आमच्याच गल्लीतल्या. पण आजोबांकडं शिकायला होता. पण त्याचे एकंदर प्रताप पाहून आजोबांनी त्याला परत धाडलं.

...तर तो मोठा आपीत्तर. काडीमुडी दिसणारा. बसक्या नाकाचा. गोरापान. चिवट. त्याची कुणाशी ओळख ना पाळख. आम्ही गोट्या खेळत असायचो. तर हा नेमका तेव्हा टपकणार. मग त्याची दादागिरी. बरं याला खेळात घेतलं तर याची रथडी. प्रत्येक खेळात तसंच. आमच्या घोळक्यात शिरून दंगा करणं हे त्याचं काम. याचा फुकट फाकटाचा त्रास. सगळ्यांना म्हणजे मलाही! सगळेच म्हणायचे, हा जीवजंतू कशाला इकडं तडफडलाय.

एके दिवशी तो बहाद्दर सर्व गोट्या हरला. मग एकदा लपाछपीमध्ये हरला. डाव आला त्याच्यावर. मग त्याला आला राग. खेळ सुरूच होता. तेव्हा त्यानं प्रचंड संतापात मला गुद्दा हाणला पोटावर आणि अंधारात गुडूप झाला. मला पक्कं माहीत होतं. मला गुद्दा हाणणारा हाच तो कडजीचा पोरगा. दुसऱ्याची हिंमत नव्हती. मग मी पहिल्यांदा दुर्लक्ष केलं. माझी खेळातून माघार. तो अंधारात लपून बसलेला. मी पोट दाबत घरी. एकदा आमचा लंगडी खेळ सुरू. तो अचानक मध्येच घुसला. पायात पाय अडकवून मला त्यानं जमिनीवर धाडकन पाडलं. धडपडून कोलमडून पडलो. मी फुफाट्यात. कपडे मातीमाती झालेले. मग मी झटक्यात उठलो. कपडे झटकले. डोकं असं सणकलं माझं. गचकन त्याची कॉलर पकडली. आमची मग बाचाबाची. दे बुक्की... चकमक... मग रस्त्यावरून जाणाऱ्या एका पोक्त बाईने ओरडून सांगितलं, 'बघा ही मुलं कशी भांडताहेत. आवरा यांना.' तेव्हा एका व्यक्तीने आम्हांला सोडवलं. बाचाबाचीमध्ये माझा खिसा मात्र टर्रकन फाटला. शर्ट जुना असला तरी आवडता होता. मन खट्टू झालं.

मग मी खिशावर हात ठेवत घरी. मी पराभवानं पेटून उठलो. रात्रभर डोक्यात विचारांचा गुंता. मनात गाठ बांधली. झोपलो. दुसऱ्या दिवसापासून मी रोज संध्याकाळी पांडव वाडा गल्लीत! तिथं एका मोठ्या नाल्याच्या काठावर व्यायामशाळा. संध्याकाळ झाली की व्यायामशाळा ठरलेली. सगळं सूममध्ये. गुपचूप. एका छोट्या बाटलीमध्ये पळीभर तेल ओतून बूच लावून बाटली चड्डीच्या खिशात. व्यायामशाळेत गेलो की, हाताच्या दंडाला, पायाच्या मांडीला तेल चोपडून मालीश सुरू. मग उठबशा. दंड बैठका. घाम निघायचा. मग पैलवानांच्या कुस्तीचा सामना बारकाईने पाहायचो. दोन आठवड्यांपर्यंत निरीक्षण एके निरीक्षण. आखाडा मस्त होता. दहा-बारा फुटांचा खोल खड्डा.

आयताकृती. त्यात लाल, भुसभुशीत माती पसरवलेली, आखाड्यात नेहमी दोनतीन जोड्यांची कुस्तीची तयारी एकसाथ सुरू असायची. बहुतेक पैलवान तगडे. बजरंग बलीला नमस्कार करून कुस्ती करायचे. मग नंतरनंतर माझ्याच वयाच्या पोरांबरोबर कुस्तीची प्रॅक्टिस सुरू. अगदी सुरुवातीला मी लगेच चीत व्हायचो. ताकद आणि चपळाई कमी पडायची. मग हुशारीने खेळायला लागलो. सरावाने तरबेज होत होतो. मग एके दिवशी घरात असंच काहीतरी भांडण-बिंडण झालेलं. घरात शांतता. भांडणाशी माझा दूरदूरपर्यंत संबंध नव्हता. तरी मला प्रचंड ओरडा बसलेला. वड्याचं तेल वांग्यावर असा प्रकार. म्हणून मी प्रचंड संतापात.

तेवढ्यात दिवे लागणीची वेळ. माझा कार्यक्रम ठरलेला. मी उठलो. तेलाची बरणी उतरवली. पळीभर तेल. बूच बंद. बाटली खिशात. पावलं व्यायामशाळेत. पावलांची झपाझप. डोक्यात राग. अंतर कळलंदेखील नाही. व्यायामशाळेत पोहोचलो. खिशातून तेलाची बाटली बाहेर काढली. शर्ट काढला. बनियानवर. बनियान जुना झालेला. बनियानला पोटाजवळ बारीक बारीक छिद्रं. जणू नक्षी. तेवढ्यात एक जण म्हणाला, ‘‘लंगोट घेतो का?’’ राग अजून डोक्यातच. मी म्हणालो, ‘‘नाही.’’ तर तो म्हणाला, ‘‘आज मी कुस्ती खेळणार नाही.’’ मी म्हणालो, ‘‘का?’’ तर म्हणाला, ‘‘पाय लचकलाये.’’ मी म्हणालो, ‘‘ठीकये! मी लंगोट, लावला आणि आखाड्यात उतरलो. तेवढ्यात लंगोट घालून समवयस्क तयार. ‘बजरंग बली की जय’. मग सुरू कुस्ती. राग डोक्यात कुटून कुटून भरलेला. दोन चार पाच मिनिटांतच एकाला चीत केलं. सपशेल चीत. भुसभुशीत माती छातीवर घेऊन तालात उड्या मारू







लागलो. पुन्हा खाली वाकून मुठीमध्ये माती घेऊन मांड्यावर टाकून तालात उड्या मारणं सुरू. निरीक्षण केलेलं कामाला येत होतं. मग लगेचच दुसऱ्या समवयस्क पैलवानास झटदिशी चीत केलं. मग तिसऱ्याला.

मग मी विजयी चेहऱ्याने, गर्वाने छाती फुगवून आखाड्या बाहेर. संतापाच्या भरात शंभरएक दंड बैठका काढल्या. मग पायात गोळे आले. दमलो. थांबलो. मग घटकाभर विश्रांती. शर्ट घालून घराचा रस्ता धरला. मग मी घरी आलो. जेवणाची वेळ झालेली. हातपाय धुतले. ताटावर बसलो. सपाटून भूक लागलेली. तीन-तीन वेळा ताटभर खिचडी घेतली. पोटभर खाऊन खाटल्यावर निजलो. सकाळी उठलो. तेव्हा गंगाराम आप्पा दोन्ही हातात मावेल एवढा कडबा खांद्यावर घेऊन गोठ्याकडं जात होते. उठलो. फटाफट अंघोळपाणी वगैरे आवरलं. भांग पाडला. दप्तर उचललं. शाळेकडं धावत गेलो. प्रार्थनेला वेळेवर पोहोचलो. छडी चुकली. मग आठवलं. आज तर शनवार. म्हणजे अर्धीच शाळा. शाळेत आज काही विशेष असं शिकवणं झालं नाही. कवायती झाल्या. मग थोड्या वेळाने मराठीच्या बाईंनी कविता वाचून दाखवली. शिकवली. कवितेचा भावार्थ डोक्यावरून. मग कवितेच्या खालची प्रश्नोत्तर... तेवढ्यात शाळेची घंटा. मग घरी दप्तर ठेवून गल्लीत. दुपारपासून पुन्हा बच्चेकंपनीचा खेळ सुरू.

आमचा आपला खेळ सुरू होता. खेळ रंगात आलेला. मध्येच तो कडजीचा पोरगा कडमडला नेहमीसारखा. त्यानं आणला व्यत्यय. रंगाचा भंग करून टाकला त्याने. वेडेवाकडे तोंड करून डोळे मिचकावून मला चिडवू लागला. त्याचा चेहरा अतिशय क्रूर दिसू लागला. मग आमचं आरे कारे सुरू. आवाज वाढला. आधी त्याचा. मग माझाही. मग मी संतापात शर्ट काढला. त्यानंही काढला. मग आम्ही दोघं एकमेकांसमोर. बनियनवर. मी उजवा पाय थोडा वर करून मांडीवर पंजा थोपटून आवाज काढला. मुरलेल्या पैलवानासारखा. गच्चकन त्याला मानेजवळ पकडलं. तो नेहमीप्रमाणे माझ्या तंगडीमध्ये तंगडी अडकवून मला पाडण्याचा प्रयत्न करू लागला. माझी तंगडी त्याला सापडेना. चटकन मी पूर्ण शक्ती पणाला लावून त्याला एका दणक्यात उचलून खाली पाडला. धपकन. संताप अजून गेला नव्हताच. 'मला चिडवतोय काय? दाखवतो तुला.' बदला तर घ्यायचाच होता. तो इतक्या जोरात पडला की त्याचा दात ओठात घुसला. ओठातून रक्त. मी त्याच्यावर आडवा. त्याला हलतासुद्धा येईना. तो जोरजोरात हात हलवण्याचा प्रयत्न करू लागला. गच्च पकडलेलं. मातीमध्ये रक्त.

तो मला रागात 'सोड सोड' म्हणून लागला. त्याचं शिव्या देणं सुरू. माझा संताप आणखी वाढला. म्हणालो, 'शिव्या देऊ नको, नाहीतर तुझ्या आख्खा हात तुझ्या घशात घालेल,'असं दरडावून बोललो. त्याला मातीमध्ये लोळवू लागलो. त्याच्या ओठातून आलेलं रक्त पाहून मित्रांची तारांबळ. मग सगळेच म्हणाले, 'अरे सोड त्याला. सोड.' त्यांनी जबरदस्ती करून मला उठवलं. सोडवलं. मी उठलो. तोही उठला. मी कपडे झटकू लागलो. उठल्याबरोबर त्यानं मला पोटात गुद्दा हाणला. मी बेसावध. ओ बाप रे ! मग मी आणखी त्याचाच डाव त्याच्यावर उलटवला. त्याची पुन्हा मानगुटी पकडून पायात पाय घालून पुन्हा धाडदिशी पाडला. आमची अशी भयंकर पराक्रमी कुस्ती पाहून मोठी माणसं धावून आली. मग आम्हांला सोडवलं. तेवढ्यात माझा मोठा भाऊ हजर. माझा उजवा हात पकडून ओढत ओढत मला घराकडं रागवत नेऊ लागला. कडजीचा पोरगा रडवेला झालेला. मग थोड्या

वेळात त्याची आई, पदर खोचून आमच्या घरी. अंगणात. तो सोबत. रडवेला. त्याच्या ओठाला हळद लावलेली. मग बराच वेळ दंगा. सगळी गल्ली जमा. फुकटचा तमाशा. मी घरात एका कोपऱ्यात पुस्तक उघडून बसलेलो. घरातले सगळेच माझ्यावर आगपाखड करू लागले. मी चूप. पुस्तक उघडं. माझी नजर पुस्तकात. कान बाहेर अंगणाकडं.

दुसऱ्या दिवशी नथूमियाची यात्रा. दुपारी यात्रेत गेलो. महादेवाच्या मंदिराजवळ कुस्त्यांचा खेळ. ढोल वाजत होते. गर्दी कापत आत घुसलो. प्रचंड गर्दीचा माहोल. नुकतीच सुरुवात झालेली. गर्दी जोशात. आधी लहान पोरांची कुस्ती. मग मोठ्यांची. तसा रिवाजच आहे. रिंगणात माझ्याच वयाच्या पोरांना लंगोट घालून एक जाडा ठेंगणा पैलवान रिंगणभर कडेकडेने फिरवत होता. ढोल वाजवणारे बेभान. वाजवणं सुरू. पैलवान एक हात उंच करून बोटाच्या चिमटीत ५० रुपये धरून. मी खिशात हात घातला. तर खडकूसुद्‌धा नव्हता. ५० रुपये पाहून मी खूश. मी आखाड्यात उतरलो. मग आमचा दोघांचा शेकहँड. नजरानजर. कुस्ती ठरली. बक्षीस ५० रुपयांचं. डावपेच माहीत झाले होते. थोडं थोडं शिकलो होतो. समोरचा पोरगा एकदम चिगुर. ढोलाचा आवाज वाढला होता. कुस्ती सुरू. झटापट सुरू. सगळ्यांच्या नजरा आमच्यावर. एका फटक्यात मी त्याला चीत केलं. लोळवलं. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट. हातावर ५० रुपये बक्षीस. नोट खिशात. मी गर्दीच्या बाहेर. थेट जिलेबीच्या दुकानावर. १० रुपयांची जिलेबी, दहाची भजी. पाच रुपयांची गोड शेव. पाच रुपयांचे बत्तासे. पोट भरलं. उर्वरित पैसे बंदुकीने फुगा फोडणे या खेळात खलास.

वटमध्ये घरी आलो. तोपर्यंत घरच्यांना सगळं समजलं होतं. कुस्ती, जिलेबी, ५० रुपये. सगळं. मग आत्याने मला तोंडावर, पाठीवर दोनचार चापटा हाणल्या. आत्याचं दातओठ खाऊन संतापात रागवणं सुरू. 'अभ्यास सोडून पैलवानकी करतोय का तू? हातपाय मोडला तर कोण करेल तुझं?' सांग. पैलवान व्हाया चालला का तू? बोल. बोल ना. मी चूप. जोरदार झापाझापी. मग त्याचा एकदर परिणाम काय? तर संध्याकाळची व्यायामशाळा बंद. कायमची बंद.

दुसरा दिवस. दुकानातून साखर आणायला जात होतो. दुपारची वेळ. समोर कडजीचा पोरगा. मग नजरानजर. त्याने वाट बदलली. मी मनोमन खूश. मग तो माझ्या वाटेला कधीच आला नाही. त्याचा माझा संबंध खलास. तो त्याचा त्याचा खेळायचा. आम्ही आमचे आमचे. त्याच्यात जोरदार बदल झालेला. सुधारला. आठ-दहा दिवसांनी मी पांडव वाड्याकडं गेलो. कामानिमित्तानं. म्हटलं आलोच आहोत इकडं तर व्यायामशाळेत जाऊया. गेलो. एकदोन पैलवान ओळखीचं हसले. मी बी हसलो. नेहमीचे पैलवान त्यांच्या नेहमीच्या सरावात व्यस्त. काहीच बदल नव्हता. नेहमी सारखंच. तेवढ्यात आखाड्याकडे अतिशय डोळे रोखून पाहणाऱ्यांकडे माझं लक्ष गेलं. पाहतो तर काय? एक काडीमुडी चुणचुणीत पोरगा दणादण कुस्ती खेळत होता. त्याच्याही पेक्षा मोठाल्या पोरांना चारीमुंड्या चीत करत होता. सगळ्यांच्या नजरा त्याच्यावर. त्याचा हुनरबाज खेळ. टाळ्या. अनेकांना त्यानं चीत केलं. सराईतपणे, चपळाईने तो कुस्तीचा डाव खेळत होता. मी जवळ गेलो. त्याला बारकाईनं निरखून पाहिलं. आणि एकदम माझे होश उडाले. भयंकर भयचकित झालो मी. बापरे ! तो पोरगा दुसरा तिसरा कुणी नव्हता तर तो होता... कडजीचा पोरगा!


**संपर्क : ९४२३४९२०८८**

# नजराणा

डॉ.नीलिमा गुंडी



मला आवडतं तिखटमीठ
गोडधोड नि आंबट, तुरट
सगळ्या चवी करतात कशा
माझ्या जिभेशी पटकन लगट!



फणसाचे गरे ... नुसतं अहाहा!
जांभळांचा रंग ओठांना हवा!
विसरीन कसा मी बरं तो?
करवंदांचा रानातला मेवा!



चिंच खावी थोडीशी ठेचून,
वरती हलकेसे मीठ पेरून!
कलिंगडाचा गड जिंकावा
होडीसारख्या फोडी करून!



ओले हरभरे नि भुईमुगाच्या शेंगा
खाते, आधी मी खरपूस भाजून!
आवळे खाते गोट्यांसारखे
हवेत उडवून, हळूच झेलून!



अननसाचे ते गोल काप!
इंग्लिश नावाचे ड्रॅगनफ्रूट
एकदा खाताच झाले हवेसे,
खाते आता मी ऊठसूट!



एका खिशात नुसते बेदाणे,
दुसऱ्या खिशात चणेफुटाणे!
छोट्या राणीला हा नजराणा,
आई म्हणे मला मिश्किलपणे.



संपर्क : ०२०–२४४८६०१५

# उखाणेबाज रामभरोसे (उत्तरार्ध)

भाग–१०

श्रीकांत बोजेवार

उखाणेबाज रामभरोसेकडे मुलींचे बाप लग्नाचे प्रस्ताव घेऊन दूरदूरून येत होते आणि अपमानित होऊन जात होते. एक दिवस एक प्रकांड पंडित राम्याकडे त्यांच्या कन्येच्या लग्नाचा प्रस्ताव घेऊन आले.... इथवर आपण गेल्या वेळच्या भागात वाचले होते.

प्रकांड पंडित आले तेव्हासुद्धा राम्या नेहमीप्रमाणे पगडी घालून गुर्मीत बसलेला होता. पंडित राम्याला म्हणाले, ''तुम्ही राजाचे सेवक आहात, माझी कन्याही संस्कृत शिकलेली आणि अतिशय हुषार आहे. तुमचा दोघांचा जोडा फार छान दिसेल.'' राम्या म्हणाला, ''आजपर्यंत माझ्या



उखाण्याचं उत्तर कुणीही देऊ शकलेला नाही. तुम्ही आधी माझ्या एका उखाण्याचं उत्तर द्या, मग मी तुमच्या प्रस्तावाचा विचार करतो.'' पंडित म्हणाला, ''विचारा की, त्यात काय एवढं?''

राम्यानं डोक्यावरची पगडी काढून ठेवली आणि मुलीच्या बापाला पुन्हा तो आधीचाच उखाणा घातला.

**'अग्नी येता आभाळाकडे धाव घेते,**

**अग्नी जाता अंगावर पांघरूण घेते.'**

प्रकांड पंडित हसले. नीट मांडी घालून बसले आणि म्हणाले, ''मला या उखाण्याचं उत्तर माहीत आहे, पण मी ते आत्ताच सांगणार नाही.'' हे उत्तर ऐकून रामभरोसे चकित झाला. त्यानं पंडिताला विचारलं, ''का नाही सांगणार? तुमच्या मुलीला माझ्याशी लग्न करायचं आहे ना?''

पंडितानं आपल्या खांद्याला लटकवलेली झोळी काढली आणि म्हणाला, ''मी ठरलेल्या गोष्टी ठरलेल्या वेळी करत असतो. आता माझी रोजची भोजनाची वेळ झाली आहे. तुमची काही हरकत नसेल तर मी आधी जेवून घेतो. एकदा पोट भरलं की मग माझं डोकं नीट काम करू लागेल.''

रामभरोसेच्या परवानगीची वाट न पाहताच पंडितांनी झोळीतून फडक्यात गुंडाळलेलं एक भलं मोठं पुडकं, फिरकीचे दोन तांबे, पळसाच्या पानांची हिरवीगार पत्रावळ आणि दोन द्रोण बाहेर काढले. पत्रावळ आणि द्रोण जवळच्या ओढ्याच्या पाण्यातून स्वच्छ धुऊन आणले. पत्रावळ समोर ठेवून त्या पत्रावळीवर कांद्याचा झुणका, ज्वारीची भाकरी, वांग्याचं भरीत, बाजरीच्या पिठात गूळ कालवून केलेली खमंग गाकर, एका द्रोणामध्ये ताक आणि एका द्रोणामध्ये पाणी ओतलं. रामभरोसे शाईच्या दौतीत टाक बुडवून काहीतरी लिहीत असल्याचे नाटक करत होता, परंतु त्याचं सगळं लक्ष पंडिताच्या पत्रावळीकडे होतं. भरपूर कांदे घातलेला, भरडा घालून केलेला झुणका आणि खरपूस भाजलेली भाकरी पाहून राम्याच्या तोंडाला पाणी




सुटत होतं. हिरव्या वांग्याचं लुसलुशीत असं भरीत आणि गाकर तर त्यानं यापूर्वी कधीच खाल्ली नसावी, असं त्याला वाटू लागलं. काम सोडून उठावं आणि पंडिताच्या समोर जाऊन जेवायलाच बसावं असं त्याला वाटू लागलं. ''बरं, जरा बाजूला जाऊन जेवायला बसा'' असंही तो सांगू शकत नव्हता. कारण तो अनेकदा मुलींच्या बापासमोर असाच जेवायला बसला होता.

तोंडाला सुटलेले पाणी ओठांमधून बाहेर उसळी घेऊ पाहात होते, ते तो कसेबसे आत ढकलत आवंढे गिळत होता. तेवढ्यात आईनं पाठवलेलं जेवण घेऊन त्याचा शेजारी ब्रम्ह्या त्याला येताना दिसला. मनातल्या मनात त्यानं हुश्श केलं. ब्रम्ह्यानं दिलेल्या फडक्याच्या गुंडाळीतून पत्रावळ बाहेर काढून राम्यानं जेवण वाढून घेतलं. ज्वारीची भाकर, भेंडीची भाजी आणि कोहळ्याची खीर. पंडिताच्या भरलेल्या ताटापुढे राम्याचं ताट म्हणजे अगदीच कसाबसा स्वयंपाक उरकून जेवण बनवल्यासारखं वाटू लागलं. राम्याच्या घशाखाली घास उतरत नव्हता आणि पंडित मात्र चार चार भाकऱ्या पोटात रिचवून आता गाकरावर तूप ओतत होता. राम्याचं डोकं आतून तापलं तरी तो काहीच बोलू शकत नव्हता. त्यानं कसंबसं जेवण संपवलं तेव्हा पंडितानं पोटावर हात फिरवत दीर्घ ढेकर दिली आणि म्हणाला,



''माझी लेक स्वैपाक एवढा उत्कृष्ट करते की, मन तृप्त होतं.'' ''हा स्वयंपाक तुमच्या लेकीनं केला होता?'' रामभरोसेनं अधीर होऊन विचारलं. पंडित म्हणाला, ''तर काय? रोज तीच स्वयंपाक करते.''

राम्यानं कसंबसं आपलं कोरडं जेवण संपवलं. या पंडिताला आपल्या उखाण्याचं उत्तर माहीत आहेच, त्यानं ते सांगितलं की आपण लगेचच याची मुलगी पाहायला जाऊ आणि विवाह निश्चित करून टाकू, असं त्यानं मनात ठरवून टाकलं. तो पंडिताला म्हणाला, ''आता आपलं दोघांचही भोजन झालेलं आहे. तुम्ही उखाण्याचं उत्तर सांगून टाका.''

पंडित म्हणाला, ''तुम्ही म्हणता तसंच मी केलं असतं, परंतु दुपारचं भोजन झालं की घटकाभर झोप काढण्याची मला सवय आहे. मी इथंच पथारी पसरून झोप काढतो, तुम्ही तुमचं काम सुरू ठेवा.'' काही मिनिटांतच पंडीत घोरू लागला. राम्या स्वतःशीच म्हणाला, ''एवढं रुचकर जेवण झाल्यावर अशी छान झोप लागणारच माणसाला. किती सुखी माणूस आहे हा. याच्या मुलीशी लग्न केल्यावर मीही असाच सुखी होणार आहे.'' कडुनिंबाच्या सावलीत पथारीवर झोपून घोरत असलेल्या पंडिताचं खाली-वर होत असलेलं पोट पाहता पाहता राम्याला पंडिताची बाजूलाच ठेवलेली झोळी दिसली. ''याच्या झोळीतल्या फडक्यात थोडीफार गाकर नक्कीच शिल्लक असेल, हा झोपलेला आहे, आपण ती खाऊन टाकली तर याला थोडीच कळणार आहे?'' असा विचार करत राम्या हळूच गेला आणि त्यानं झोळी चाचपडून पाहिली. फडके सोडून पाहिले तर त्यात एक संपूर्ण गाकर शिल्लक होते. राम्यानं त्यावर झोळीतल्या तांब्यातून तूप ओतून घेतलं आणि मिटक्या मारत गाकर संपवले. झोळी होती तशी ठेवून दिली. एवढी स्वादिष्ट गाकर बनवणारी मुलगी आपली पत्नी व्हायलाच हवी असं त्याचं मन त्याला वारंवार सांगू लागलं. ''पंडिताची झोप झाली की आपण त्याला उखाण्याचं उत्तर विचारायचं. ते उत्तर चुकीचं असलं तरी काही हरकत नाही. या पंडिताची मुलगीच आपली बायको झाली पाहिजे.''

घटकाभर झोपून पंडीत उठला. ओढ्यावर जाऊन तोंडावर पाणी मारून, चूळ भरून तो आला. राम्यासमोर बसून त्यानं कमरेला लावलेली चंची काढली. चंचीतून विड्याची पानं, चुना, काथ, सुपारी काढली आणि निवांतपणे पान तयार करू लागला. अधीर राम्या म्हणाला, ''पंडितजी, माझ्या कोड्याचं उत्तर सांगून टाका लगेचच, म्हणजे मग आपल्याला पुढचं बोलता येईल.''

पंडित म्हणाला, ''ऐका. तुमचा उखाणा आहे–

**अग्नी येता आभाळाकडे धाव घेते,**

**अग्नी जाता अंगावर पांघरूण घेते.**''

या उखाण्याचं उत्तर आहे, दूध. खालून अग्नी दिला की दूध तापतं, उतू जातं म्हणजे आकाशाच्या दिशेनं जातं. अग्नी गेला की ते शांत होतं आणि मग त्यावर साय धरते. म्हणजेच दूध अंगावर पांघरूण घेतं.

रामभरोसे उठला आणि त्यानं पंडितापुढे हात जोडले. म्हणाला ''तुम्ही एवढे विद्वान, तुमची कन्याही हुशार आणि सुगरण. आपण विवाह आजच निश्चित करून टाकू.''

पंडित म्हणाले, ''मी ध्यान धरतो आणि माझ्या मुलीशी संपर्क साधतो. ती काय म्हणते ते बघतो.'' पंडिताने डोळे मिटून ध्यान लावले. मनाचा मनाशी संपर्क साधण्यासाठी चित्त एकाग्र केले. काही क्षणांनी डोळे उघडून ते म्हणाले, ''माझी कन्या म्हणते आहे, अन्न चोरून खाणाऱ्याशी मी विवाह करणार नाही.'' रामभरोसे चपापला. या पंडितापासून काहीही लपवण्यात अर्थ नाही हे त्याच्या लक्षात आलं. त्यानं हात जोडले आणि म्हणाला, ''तुमच्या पत्रावळीतले गाकर पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटले होते, त्यामुळे मला राहवले नाही. तुम्ही झोपल्यावर झोळीत शिल्लक असलेले गाकर मी चोरून खाल्ले. परंतु तुमच्या मुलीला ते कळलं. मी हात जोडून माफी मागतो. तुमच्या घराण्याशी संबंध जुळले तर मला मनापासून आनंद होईल.''

पंडित म्हणाले, ''तुम्ही माफी मागून उपयोग नाही. तुमच्या आईनं इथं येऊन माफी मागायला हवी.''

रामभरोसे अजिजीनं म्हणाला, ''पंडितजी, गुन्हा मी केला मग माफी आईनं कशाला मागायला हवी?

''तुम्हांला लग्न मुलीशी करायचं होतं ना, मग उखाणे त्या मुलींच्या बापाला कशाला घातलेत?''

आपली चूक लक्षात येऊन रामभरोसे वरमला. मान खाली घालून उभा राहिला आणि म्हणाला, ''त्या सर्व लोकांची मी क्षमा मागायला तयार आहे. चूक झाली माझी. अहंकारापोटी माझा तोल गेला होता. तुम्ही मला चांगलाच धडा शिकवला.'' पंडित म्हणाले, ''जेवढ्या जणांचा अपमान केलास त्यांची माफी मागावी लागेल तुम्हांला. त्यांना घरी बोलवून स्वादिष्ट भोजन द्यावे लागेल आणि माझ्या मुलीनं तुम्हांला पाहून पसंत केलं, होकार दिला तरच तिच्याशी तुमचं लग्नं होईल.''

रामभरोसेनं त्यालाही होकार दिला. रामभरोसे मुळात हुशार आणि कल्पक होताच. त्याच्या हुशारीला सतत कुठल्या तरी अवगुणाचा स्पर्श होत होता आणि ती हुशारी वाया जाई. सर्व अवगुणमुक्त झालेल्या रामभरोसेला पंडिताची कन्या सुबुद्धी हिने होकार दिला आणि दोघांचा विवाह झाला. राम्याच्या आईला खूप आनंद झाला. रामभरोसे आता सुखानं संसार करत आहे.

**बालमित्रांनो, या कथांमधून गेले वर्षभर आपण ज्या अवगुणांचा समाचार घेतला, त्या अवगुणांचा वारा तुम्हीही स्वतःला लागू देऊ नका. आपल्या हुशारीचा योग्य उपयोग करा आणि देशाचे एक चांगले नागरिक बना. कथा वाचून मला अनेक फोन आजवर आले आहेत. उखाण्याचे उत्तर विचारण्यासाठीही खूप फोन आले. त्या सर्व मित्रांचे आभार.**

**संपर्क : ९८९२४१९२६७**

# गोष्ट आर्थिक साक्षरतेची

सुधीर साबळे



पुण्यातल्या विद्यानिकेतन शाळेत विनय पाचव्या इयत्तेमध्ये शिकत होता. खेळणे, खाणे, मोबाईल या तीन गोष्टी त्याच्या अत्यंत आवडीच्या. कधी हातात पैसे आले की ते लगेच खाण्यावर खर्च करायचे हे त्याचे ठरलेले. गावावरून कधी आजी आली की, परत जाताना ती विनयच्या हातावर ५०-१०० रुपये ठेवायची. ते पैसे मिळाले की विनय तडक घराजवळ असणारे मिठाईचे दुकान गाठायचा, शेवपापडी खरेदी करायला. त्या दुकानातली शेवपापडी सर्वत्र प्रसिद्ध. त्यामुळे कुणी पैसे दिले की विनयचे पाय त्या दुकानाकडे ओढले जायचे. त्या पैशांत येईल तेवढा मेवा घ्यायचा आणि मित्रमंडळींना गोळा करून तो फस्त करायचा. शेवपापडी खरेदी करताना विनय दुकानदाराला कधी भाव विचारायचा नाही, त्याला म्हणायचा, मला ५० रुपयांची शेव पापडी द्या. दुकानदार देखील लहान समजून जिन्नस द्यायचा, ५० रुपयांत किती शेवपापडी आली, हे त्याला सांगायच्या भानगडीत पडायचा नाही. विनयदेखील काही न विचारता कधी एकदा शेवपापडी खाण्यासाठी मित्रांना बोलावतोय आणि कधी ती खातोय असा विचार करत घर गाठायचा. विनयचे आई-वडील त्याला कधी पैसे देत नसत किंवा इतर कोणत्या दुकानातून काही आणायला सांगत नसत. त्यामुळे विनयचा संबंध त्या मिठाईच्या दुकानापुरताच मर्यादित होता. तो संबंधही कधी कुणी खाऊला पैसे दिले तरच येत असे.

दिवाळीची सुटी सुरू झाली. घरात चकली, शेव, चिवडा, शंकरपाळी असे फराळाचे पदार्थ बनवायचे काम सुरू होते. कामाच्या निमित्ताने कोलकात्याला असणारे विनयचे काका या वर्षी दिवाळीसाठी घरी येणार होते. दिवाळीच्या दोन दिवस आधी विनयचे काका, काकू अशी सगळी मंडळी घरी आली. दुसऱ्या दिवशी सकाळी दिवाळीसाठी प्रत्येकाकरता काहीतरी खरेदी करण्यासाठी काका विनयला घेऊन बाजारपेठेत गेले. खरेदी करताना बरोबर आणलेल्या सगळ्या पिशव्या भरून गेल्या, म्हणून काका विनयला म्हणाले, ''तुला २० रुपये देतो. समोरच्या दुकानातून एक कापडाची पिशवी घेऊन ये.'' विनय दुकानात गेला, दुकानदाराला विचारले, ''काका तुमच्याकडे कापडी पिशवी आहे का?'' त्यांनी ''हो'' म्हटले आणि विचारले, ''किती देऊ?'' त्यावर विनय म्हणाला, ''एक द्या.'' दुकानदाराने पिशवी दिली, विनयने ती घेतली, त्याच्या हातावर २० रुपये टेकवले आणि काकांकडे गेला. पिशवी हातात घेतल्यावर काकांनी विचारले, ''विनय, पिशवी अजून थोडी मोठी हवी होती, ही केवढ्याची आहे?'' विनय म्हणाला, ''मी त्याला किंमत विचारली नाही, त्याने मला पिशवी दिली, मी त्याला २० रुपये दिले. मी शेवपापडी घ्यायला जातो, तेव्हा मी असेच करतो. ५० रुपयांची पापडी घेतो, त्या दुकानदाराला बाकी काही विचारत नाही.''

विनयने हे सांगितल्यावर काका त्याला त्या दुकानात घेऊन गेले, दुकानदाराला पिशवीची किंमत विचारली. दुकानदार म्हणाला, ''साहेब, या पिशवीची किंमत १२ रुपये आहे.'' काकांनी विचारले, ''याने तुम्हांला २० रुपये दिले होते, तुम्ही त्याला आठ रुपये परत का दिले नाहीत?'' तो म्हणाला, ''साहेब, त्याने मला किंमतच विचारली नाही. उरलेले पैसे देण्यासाठी मी काऊंटरजवळ गेलो, तेव्हा हा मुलगा दुकानातून निघून गेला होता. त्याने मला फक्त पिशवी मागितली होती, तिची किंमत विचारलीच नाही.'' हे ऐकल्यावर काकादेखील विनयला रागावले. खरेदीचा कार्यक्रम आटोपून ते घरी आले. संध्याकाळी घरातील सगळे जण जेवणासाठी एकत्र बसले असताना विनयच्या काकांनी दुकानात घडलेला प्रसंग त्याचे वडील रमेश यांना संगितला. तो ऐकल्यावर त्यांनीदेखील विनयला बडबड करण्यास सुरुवात केली. पण त्यात काकांनी हस्तक्षेप केला आणि ते म्हणाले की, ''त्याला रागावण्यापेक्षा व्यवहार काय असतो, तो कसा करायचा, पैशांची बचत काय असते, हे तुम्ही त्याला शिकवायला हवे. दर महिन्याला त्याला पॉकेटमनीच्या स्वरूपात १०-२० रुपये द्यायला हवेत, ते पैसे कुठे खर्च केले, त्यामधले काही बचत केले का, असे महिनाअखेरीस त्याला

विचारायला हवे. हे केले तरच त्याला आर्थिक व्यवहार कसा होतो, हे समजू लागेल. आजवर ही सवय लावली नाहीत, आता आजपासून तरी ती त्याला लावा, म्हणजे जसजसा तो मोठा होईल तसतशी त्याला पैशाची किंमत समजेल आणि त्याच्या जोडीला व्यवहार देखील.''

विनयचे काका अविनाश यांनी सांगितलेली गोष्ट त्याच्या आईवडलांना पटली, त्यामुळे दिवाळीच्या मुहूर्तावर त्यांनी त्याची सुरुवात केली. घरात काही किरकोळ वस्तू लागणार असतील तर जवळच्या दुकानातून त्या आणण्याची जबाबदारी आई विनयकडे देऊ लागली. पिशवी घेताना घडलेला किस्सा विनयच्या मनात घर करून बसला होता, त्यामुळे दुकानात काही आणायला गेला की तोही त्या वस्तूची किंमत विचारू लागला. आपल्याकडे किती पैसे दिले होते, त्या वस्तूसाठी किती खर्च झाले, किती पैसे राहिले, याचा हिशोब ठेवू लागला. त्यासाठी त्याने एक वही केली, तिच्यात तो नोंद करू लागला. वडलांनी त्याला महिन्याला १५ रुपये पॉकेटमनी देण्यास सुरुवात केली. आवश्यक असेल तरच पैसे खर्च करायचे, नाही तर त्याची बचत करायची, अशी सवय विनयने लावून घेतली. कधी आजी आली तर तिच्याकडून मिळणारे ५०-१०० रुपये शेवपापडीवर खर्च करण्याऐवजी त्यांची बचत करून ते योग्य कामांसाठी वापरू लागला. पाचवीत असताना त्याला हळूहळू व्यवहार समजू लागला. पैशांची बचत करायची असते, हे समजले. आपल्याकडे पैसे असतील तरच त्यातून गरजा पुऱ्या होऊ शकतात, याची समज त्याला आर्थिक व्यवहारातून येत गेली. जसजसा तो एक-एक इयत्ता पुढे सरकत होता, तसतशी त्याच्या व्यावहारिक ज्ञानाला बळकटी मिळत गेली. आठव्या इयत्तेत असताना त्याने बँकेत चेक भरण्यासाठी आवश्यक स्लिप भरायला सुरुवात केली. हळूहळू बँकेत जाऊन चेक भरणे, पासबुक भरून आणणे अशी कामे तो करू लागला. या कामांमधून विनयला व्यावहारिक ज्ञान येऊ लागले. त्याचा त्याच्या घरच्यांना अभिमान होता.

विनयचे काका दिवाळीला त्याच्याकडे आले नसते तर विनय योग्य वयात आर्थिक साक्षर झाला नसता. आपण देखील आपल्या मुलांना योग्य वयात आर्थिक गोष्टी शिकवणे गरजेचे आहे. आजकालची मुले ऑनलाइन गेम, टीव्ही, कॉम्प्युटर, यामध्ये सर्वाधिक वेळ खर्च करतात, त्यामुळे आयुष्यात आवश्यक असणाऱ्या कौशल्यांपासून ते दूर राहतात. मुले मोठी होताना त्यांना याची माहिती असणे आवश्यक असते, पण पालक त्याकडे कितपत पाहतात, हा संशोधनाचा विषय आहे. काळ बदलतोय हे बरोबर असले तरी आपल्या मुलामध्ये जीवन घडवण्यासाठी आवश्यक असणारी जीवनकौशल्ये (Life Skills) आहेत का, हे तपासून विकसित करण्याची जबाबदारी प्रत्येक पालकाची आहे, हे विसरून चालणार नाही..

**संपर्क : ९४२१०८००७२**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस, सर्व्हे नं.४८, घर पट्टी नं.४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे-४०० ६१२ येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे-४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Textbook Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane-400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411 004. * Editor - Krishnakumar Patil.**

# संत गाडगेबाबा

सुचिता कुलकर्णी (जोशी)



स्वच्छतेचा मंत्र । जगी सिद्‌ध केला ।
उपदेश केला । साऱ्या जना ।।
संवेदनशील। मनाचा प्रेमळ ।
अंतरी निर्मळ । डेबू असे ।।
खराटा नि झाडू । घमेले घेऊन ।
काढसी झाडून । गावोगावी ।।
नको अंधश्रद्‌धा । नको अहंकार ।
करावा विचार । विवेकाने ।।
मुक्या या जीवास । कधी मारू नये ।
लोभ ठेऊ नये । मनामध्ये ।।
किर्तनी रंगले । प्रबोधन केले ।
ज्ञानदान केले । भजनात ।।
गोपाळा गोपाळा । नामघोष होता ।
किर्तनी रंगता । दंग होई ।।
निरोगी आरोग्य । भविष्याचा वेध ।
समाज सावध । करुनिया ।।
विवेक बुद्धीने । विचार करावा ।
मार्ग हा धरावा । सत्यधर्मी ।।

संपर्क : ८२७५२३२०४५

# पकडून ठेवणारं भूत

डॉ. रसिका ठोसर-वाघोलीकर



‘‘राजेशला काय झालंय? अचानक वेगळाच वागायला लागलाय तो!’’ स्वराज एकदम काळजीच्या सुरात म्हणत होता.

‘‘हो ना! अरे काल पण तो नुसताच टक लावून एका दगडाकडे बघत बसलेला. अणि काहीतरी पुटपुटत पण होता. मी तर घाबरलेच त्याला बघून!’’ अवनीने दुजोरा दिला.

‘‘काही नाही रे! परीक्षेचं टेन्शन आले असेल त्याला. अभ्यास झाला नसेल जास्त.’’ सूरज बॉल कॅच करत म्हणाला.

‘‘अरे ते जाऊदे. ह्या रविवारी मस्त टेकडीवर जायचं का फिरायला. खूप मजा येईल. मी फोनपण घेऊन येईन. छान फोटो येतात तिथे. फेसबुकवर टाकले की खूप लाईक्स मिळतील’’ तन्मयने विषय बदलला.

सगळ्यांना आयडिया तर खूप आवडली. ‘पण तुझा फोन नको आणू रे, नुसते फोटो काढण्यातच सगळा वेळ जातो’ अशी सूचना आली. तन्मयला ते फारसं काही पटलं नाही. आठवी–नववीमध्ये असलेल्या मुलांच्या ह्या ग्रुपमधल्या फक्त तन्मयला वडलांनी त्याच्या हट्टापायी मोबाईल घेऊन दिला होता. तेव्हापासून गेम खेळणे, सोशल मीडियावर फोटो टाकणे, ऑनलाईन शॉपिंग करणे हे त्याने सर्रास चालू केले होते. एकदा फोन हातात घेतला की त्याला सगळ्या गोष्टींचा विसर पडत असे. परवा तर तो गेम खेळत बसला अणि क्लासला जायला पण विसरला होता. संध्याकाळी क्रिकेट, फुटबॉल खेळायचे सोडून फेसबुकवर मित्र जोडणे हाच त्याचा छंद झाला होता. मित्रांशी समक्ष बोलणं पण आता जरा कमीच झालं होतं. फोटो काढायच्या निमित्ताने का होईना पण तो टेकडीवर येतोय हीच मोठी गोष्ट होती. तर ठरल्याप्रमाणे सर्व जण सकाळी सायकली घेऊन टेकडीकडे रवाना झाले. थंडगार हवेत जाताना खूपच मजा येत होती. टेकडीच्या पायथ्याशी असलेली सुंदर फुलं, छोटी रोपं बघून सगळेच खूष झाले. तन्मयचे मोबाईलवर फोटो काढणेही चालूच होते.

गप्पागोष्टी करत, उड्या मारत टेकडी चढल्यानंतर घामाच्या धारा वाहायला लागल्या. पाणी पिऊन सगळे वर असलेल्या हनुमान मंदिराकडे निघाले. तन्मयला कोणाचा तरी फोन आल्यामुळे तो मागेच घुटमळत होता. बाकीचे मंदिरात दर्शन घेऊन आजूबाजूचा परिसर बघत होते. तन्मय फोनवर बोलून घाईने मंदिरात शिरला. सगळीकडे पाहिले तरी कोणीच दिसले नाही. आवाजही येत नव्हता कोणाचाच. पुढे गेले असतील बहुतेक असा विचार करून तो पायवाटेकडे जाणार इतक्यात ‘‘तन्मय तन्मय’’ असा आवाज घुमला. ‘‘प्लीज, मला सोडव तन्मय’’ पुन्हा आवाज आला. तन्मयची आता बोबडीच वळली.

‘‘कोण आहे तिकडे? अवनी, राजेश, स्वराज कुठे आहात तुम्ही?’’ त्यानं हिंमत करून विचारलं. पानांची सळसळ आणि कावळ्याची कावकाव याशिवाय काहीच आवाज आला नाही.

‘‘अरे, एवढा काय घाबरतोस तन्मय आणि मला ओळखत नाहीस की काय! सदानकदा तुझ्यासोबतच तर असतो मी. उठल्यापासून झोपेपर्यंत.’’ तो आवाज हसत म्हणाला.

तन्मयने कॉल करण्यासाठी मोबाईल बाहेर काढला. नेमका आऊट ऑफ नेटवर्क होता तो! त्याला चांगलाच घाम फुटला.

‘‘तुझा मित्र राजेश, त्याचा मेंदू मी चांगला पकडून ठेवलाय. आता तुझी पाळी आहे. त्यामुळेच मला पकडून ठेवणारं भूत असं नाव दिलेलं आहे.’’ परत आवाज घुमला.

‘‘काय केलंय तुम्ही राजेशला?’’ तन्मयने घाबरत विचारलं.

‘‘कळलं नाही का तुला? मी कब्जा केलाय त्याच्या मेंदू, हात, डोळ्यांवर त्या मोबाईल सारखाच. त्याला दुसरं काही सुचतच नाही त्यामुळे. एकटाच बसतो, सारखी माझी आठवण काढत असतो. सारखाच मला हातात घ्यायचा प्रयत्न करतो, कितीही बोटं, डोळे दुखले तरीही. मी आता त्याच्या डोक्यातच राहतो आहे.’’ परत तोच भीतिदायक आवाज. आता तन्मयला चांगलीच भिती वाटायला लागली. ‘पकडून ठेवणारं भूत... मला तर पहिलं पकडेल,’असे विचार त्याच्या



मनात येऊ लागले.

''हंऽऽ समजलेलं दिसतंय तुला मी नक्की कोणाला पकडून त्रास देतो ते.'' भूत ओरडून म्हणालं.

''हो चांगलं समजलंय मला, पण राजेश एवढा जास्त फोन वापरतो हे माहीत नव्हतं मला. तुम्ही काहीपण करा पण राजेशला नका त्रास देऊ. तो खरंच वेड्यासारखं वागतोय खूप हल्ली.'' धीर ठेवून तन्मय म्हणाला.

''घरी त्याच्या बहिणीचा फोन वापरत होता तो चोवीस तास. त्यामुळे मला यावं लागलं. आजकाल मला बऱ्याच लोकांवर लक्ष ठेवावं लागत आहे. मोबाईल फोन वापरणारे वाढलेत ना कारण.'' भूत खूश होऊन म्हणालं.

''तू आता एकच कर. मी राजेशला सोडून द्यावं असं जर तुला मनापासून वाटत असेल तर तू मोबाईल वापरणं सोडून दे. नाहीतर राजेशला तर मी सोडणार नाहीच पण तुझाही ताबा घेईन.''

''हो हो नक्की. मी प्रॉमिस करतो. मी आजपासूनच तो मोबाईल फोन ठेवून देतो. नाही वापरणार मी तो उगीचच. पण प्लीज राजेशला सोडा अणि मलापण.'' तन्मय गयावया करत म्हणाला.

''ठीके ठीके. तू आता एकदाही मागे न बघता पळून जा इथून. राजेशला पण सोडतो मग मी.'' हे भूताच्या तोंडून ऐकताच तन्मय जे पळाला ते टेकडीच्या पायथ्याशी येईपर्यंत थांबलाच नाही. खाली आल्यावर त्याला थोडं हायसं वाटलं. तरीही मित्र न भेटल्यामुळे तो बेचैनच होता. तेवढ्यात लांबून कोणीतरी बोलतायत असं वाटायला लागलं. राजेश, अवनी, स्वराज, सूरज चालत येताना दिसले. ''कुठे होतात तुम्ही? कित्ती शोधलं मी तुम्हांला! अणि राजेश ठीक आहेस ना तू??'' तन्मय तिथूनच ओरडला.

''आम्ही पण कधीपासून शोधतोय तुला. कुठेतरी मोबाईल बघत बसला असशील ना तू?'' अवनीने टोमणा मारला.

''राजेश तर आमच्या सोबतच आहे आणि.''

''त्या मोबाईलचं नावच नका काढू रे! मला आज एका भुताने जवळ जवळ पकडलं होतं. आणि राजेशला पण पकडलं होतं. कसाबसा पळून आलोय मी'' तन्मय घाम पुसत म्हणाला.

''भूतबीत काही नसतं रे! उगीच घाबरतोस तू! राजेश तर कुठेही गेलेला नाही'' आम्हांला सोडून सूरज टोपी उडवत म्हणाला.

''काय चालू आहे आज काय माहीत!! पण भूत असतं, मी टीव्हीवर पाहिलंय खूपदा.''

''चला तुम्ही पट्कन आता. मला इथे अजिबात थांबायचं नाहिये.'' तन्मय अजूनही घाबरलेलाच होता.

तन्मयला घाबरवून मोबाईलचे व्यसन सोडवण्याचा प्लॅन यशस्वी झाल्यामुळे बाकीची मंडळी मात्र डोळे मिचकावून हसत होती, राजेशला विचित्र वागायचा मस्त अभिनय केल्याबद्दल मनोमन शाबासकी देत होती. अवनीकडे असलेला माईकपण भुताचा मोठा आवाज काढायला चांगलाच कामी आला होता. मित्राला वेळेवर मोबाईलच्या कचाट्यातून बाहेर काढल्यामुळे सर्वांना खूपच आनंद झाला होता.

''आईस्क्रीम पार्टी करू रे आता, म्हणजे तन्मयच्या डोक्यावरचं भूतपण थंड होऊन जाईल आणि आपण त्याची घेतलेली फिरकीपण त्याला सांगू. म्हणजे त्याला योग्य काय ते कळेल.'' राजेशने सुचवले तसे सगळे 'येस्स' म्हणत पुढे पळाले.

संपर्क : ९९७०२७३८४१

भानुदास धोत्रे

# हिवाळ्याचे हिव

हिवाळ्याचे हिव आले लग बग लग
अंग कसे हलू लागे डग मग डग

कानटोपी स्वेटर मफलर,गुब गुब गुब
अंगाला या देऊ चला ऊब ऊब ऊब

हातपाय दुमडून होऊ, गुम सुम गुम
ढाराढूर झोपी जाऊ रूम झूम रूम

पहाटेचं झेलायाला ऊन ऊन ऊन
उठा म्हणुनीया गाणे गुण गुण गुण

चहाची ती मज्जा घेऊ फुर फुर फुर
थंडीला या ठेवू थोडे दूर दूर दूर

संपर्क : ७९७२६२५०८६



# कल्पना आणि कौशल्याची झेप

रेणू दांडेकर



मुलांनो तुम्ही ग्रेटच आहात. तुम्हांला काय काय सुचतं, तुमच्या डोक्यात भन्नाट कल्पना असतात. एकदा शाळेत गंमत झाली. एका शिक्षकांनी मुलांना विचारले, ''तुम्हांला या दहा बोटांनी काय काय करता येते?'' एक मुलगा म्हणाला, ''सगळे तर या दहा बोटांनीच करतो. पण दर वेळी सगळी बोटं वापरतोच असं नाही ना!'' सगळेच हसले, सरही हसले. ''पण मला असं विचारायचंय की वेगळं काय करता येते? कारण तुमच्या बोटात जादू आहे दोस्तांनो!'' असं म्हणताच मग मुलं गप्प गप्प झाली. शांत बसली, विचार करू लागली, एकदा आमच्या शाळेत कौशल्य शिक्षणाचा तास होता. ही सातवीची मुलं जेवढी दंगेखोर होती तेवढीच काही काही नावीन्यपूर्ण करणारी होती. मुलांना एलईडीचं मूळ तंत्र शिकवलं होतं. एलईडीचा वापर करून बॅटरीज्, कंदील अशा वस्तू तर बनवल्या होत्याच, शाळेत दीपनृत्याला लागणारे सुंदर रंगीत दिवेही तयार केले होते. दिव्यांच्या माळा तयार केल्या होत्या. सातवी आणि आठवीचा एक गट होता, ही सगळी खेड्यातली मुलं होती, नि शाळाही त्यांची. एका हिरवाईच्या बाऊलमध्ये होती, म्हणजे सगळ्या बाजूंनी दाट झाडी होती. निसर्गाच्या जवळ असणारी ही मुले आपल्या आईवडलांना शेतावर जाताना पाहत होती. वेळ मिळाला की ही मुलंही शेतात जात होती. एरवी शेतापासून दूर गेलेली मुलं नि या मुलांत खूप फरक होता. अनेक गोष्टी त्यांना प्रत्यक्ष माहीत होत्या. कलमं बांधणं जसं जमायचं तसं नारळाच्या झाडावर मुलीही चढतील असं यंत्र त्यांनी बनवलं होतं नि ती मुलंमुली प्रात्यक्षिकही दाखवायची. इतक्या बारीकसारीक गोष्टी त्यांना माहीत होत्या आणि त्यांनी त्या हाताने बनवल्या होत्या. सरांच्या प्रश्नांचं उत्तर त्यांना माहीत होतं पण देता आलं नव्हतं. त्या उत्तराच्या या दोन गोष्टी.

एक दिवस मुलं विचार करत होती, ''काय रे चाललंय?'' सरांनी विचारताच मुलं म्हणाली ''एक वस्तू बनवायचीय.'' ''काय रे...?'' सरांना नेहमीचं



माहीत होतं की मुलांच्या डोक्यात काहीतरी चाललंय. बोटांची चुळबूळ सुरू झालीय. मिळालेल्या कौशल्यातून काहीतरी करायचंय... एक मुलगी म्हणाली, ''सर! मी सांगते, भातशेतीच्या दिवसात रात्रीही शेतात जावं लागतं. दिवा नीट नसतो. मोबाईल पुरत नाही, आणि पावसाने इतर दिवे विझतात. कुणाला तरी एका हाताने दिवा धरावा लागतो.'' ''मग? तुम्ही काय आता शरीरभर दिवे लावणार की काय?'' सरांनी विचारले. आता या विनोदाला कुणीच हसेना. सगळी दंग होती, एक मुलगा म्हणाला, ''सर हेडलाईट तयार करायचं ठरवलंय..'' मुलांपुढे अनेक प्रश्न होते, तो केवढा ठेवावा? डोक्यावर कसा बसवावा? किती प्रकाश हवा? किती तरी प्रश्न... ''दोरीत ओवून बांधूया.'' एकानं सुचवलं, पण तो राहणार कसा? दोरी टोचेल... मुलं कामाला लागली होती. प्रकाश किती हवाय? केवढा परिसर प्रकाशात यायला हवा? याची चाचणी वर्गाच्या खिडक्या बंद करून सुरू झाली. एक मुलगा म्हणाला, ''असं नको. आज रात्री आपण कुणी तरी हा घरी नेऊ. शेतात नेऊ रात्री आणि प्रत्यक्ष बघू...'' त्याचा मुद्दा बरोबर असल्याने सगळ्यांना पटला. दुसऱ्या दिवशी तसा दिवा तयार झाला. एका मुलानं काय केलं की, जवळ उभ्या असलेल्या मुलीला तिच्या डोक्यावरचा रुंद पट्ट्याचा हेअरबँड होता तो मागितला. ''याला आपण हा दिवा बसवूया. बरोबर समोर प्रकाश पडेल. प्रकाश अँडजेस्ट होईल असे सेटिंग करू. शेतात काम करताना मान खाली गेली की प्रकाश खाली पडेल. आपल्या आईबाबांना कामही करता येईल. शिवाय आपण त्यांच्यासाठी हा दिवा बनवला याचा त्यांना आनंदही होईल. भन्नाट रे गड्या आपण असेच तर करत गेलो, करण्यातून सुचत गेले...'' असं म्हणत मुलं कामाला लागली.

आणि मुलांच्या भावनिक कौशल्यातून, व्यवसाय कौशल्यातून आई-वडलांना जपणारा आणि प्रकाश देणारा हेड लाईट तयार झाला. घरी मुलं आईला धान्य निवडताना पाहत होती, भाजी चिरताना पाहत होती. खाली वाकावं लागे, कधी ताटाला धक्का लागला तर सांडलवंड होत होती. पुन्हा नव्या कल्पनेची भरारी... आपण अनेक गोष्टींसाठी उपयोगी पडेल असं एक टेबल बनवूया... झालं, मुलं तयारीला लागली, इथेही एलईडीचा वापर, शिवाय सूर्याच्या उष्णतेवर. एकेकदा दिवे जात आणि काम करताना त्रास होई. ऐन पावसात नाहीपण एरवी तर हे उपयोगी पडणार होते. एक असे टेबल तयार केलं मुलांनी. रंधा मारणं, पॉलीश करणं, त्यावर एका पट्टीत दिवे बसवणं, उघडझाप करणारी रचना.. सगळं मुलांचं कौशल्य! आणि खरंच असं टेबल तयार झालं. अनेक मुलांच्या घरात दिसू लागले, जेव्हा आई काम करत नसे तेव्हा मुलांना ते लिहायला उपयोगी पडू लागलं. एकदा बेसिक गोष्ट आली नि समजली की मुलं भरारी मारतात. मग उच्चशिक्षित विद्यार्थ्यांनाही आश्चर्य वाटतं नि पुस्तक प्रत्यक्षात कसं असं, कसं तयार होतं हे समजतं....

यालाच तर म्हणतात ना कल्पना आणि कौशल्याची झेप...

**संपर्क : ९३५६८०५४६१**

# जंगल

अनुज अविनाश केसरकर




हरीण पळू लागल्याचं,
जंगलाला कळलं
हरीण पळू लागल्यावर
जंगल जागं झालं....
नेम धरला माणसाने
हरीण झालं गप्पगार
हरीण मेल्याचं ऐकून
जंगल झालं गार.......
माणूस थोडा पुढे झाला
लावून आग मोकळा झाला
आगीचा वणवा झाला
वाघ पळून गेला......
पळता पळता वाघाला
दिसली टोळी माणसांची
कत्तल झाली हातोहात
हिरव्यागार झाडांची......
उभी राहिली, जंगले सिमेंटची
सजीव प्रेतांवर
जंगली झालेला माणूस
जंगल नावाच्या बेटावर.....
वाघ बावरला, घाबरला, हद्दपार झाला
वनव्यान पेटलं सारं जंगल,
माणसाच्या कात्र्यानं
केली भलीमोठी दंगल...
जंगल रडलं आभाळभर
दवं पिऊन पडलेलं
पाऊस झाला मुसळधार
जीव देऊन रडलेलं.....
जळत्या रानातलं पळतं माकड धरून,
माकडाचं खेळणं केलं
रस्तोरस्ती सोंग विदूषकाचं
माकड जंगलातलं झालं....



मुक्यांच्या जीवावर
बोलणाऱ्यांचं पिकं उठलं आहे
साधासुधं जंगल,
कोण ठार करत सुटलं आहे...
चाललंय शहर घुसत जंगलात
कुठे सापाने जायचं
जगणं सरपटलेलं जगतचं
माणसांनी ठार करायचं....
राघू, पारवा, घुबडाचं
आभाळ जरा खुंटलं आहे
घरटं बांधायचं झाड
वणवा करत सुटलं आहे....
घेऊन अंगावर जंगल
रोज वहायची नदी
शहरात झालाय नाला,
नदी इथेच होती म्हणे आधी....
माणसाने डाव धरलायं
जंगलाचा भरलेपणा,
हिरवेपणा, ताजेपणा
आता फक्त पुस्तकात उरलायं....
आभाळ घेऊन अंगावर
जंगल बिथरलंय
दयेवाचून वितळलंय
रानावनातून हद्दपार होऊन कोसळलंय....
जंगल बाहेर
आत माणूस आहे
चाललंय घुसत शहर
हरवून जंगल जात आहे
थोडं आता,
रान होऊन उठावं म्हणतोय
घाव भरलेल्या झाडांतून
पालवीला फुटावं म्हणतोय....

संपर्क : ८०८०३३६४८८











# धाडसी रोहन

दिलीप फलटणकर

रविवारचा दिवस. दुपारची वेळ होती. आज रोहनला सुट्टी होती. बाहेर पाऊस थांबला होता. रोहनची आई म्हणाली, ''अरे रोहन, उद्या मला कामाला जायचंय. माझी स्कुटी चिखलानं भरलीय, नदीवर ने आणि धुऊन आण.''

''हो, आई !'' म्हणत रोहनने हातातले पुस्तक खाली ठेवले आणि घराबाहेर आला. स्कुटी ढकलत रस्त्यावर आणली आणि सुरू केली. चार-पाच दिवस खूप पाऊस पडत असल्याने डोंबरी नदी दुथडी भरून वाहत होती. नदीला पूर आल्याने जोराचा आवाज येत होता. रोहनचे पाय चिखलाने भरले होते. तो तसाच नदीजवळ आला आणि स्कुटी स्टॅण्डवर उभी केली. पाऊस थांबल्याने गावातल्या महिला धुणे धुवायला नदीवर आल्या होत्या. काही मुले पाण्यात पोहत होती.... काही खेळत होती. रोहनने स्कुटीचा चिखल धुऊन काढला आणि कापडाने स्कुटी पुसू लागला, इतक्यात त्याच्या कानावर आवाज आला,

''वाचवाऽ ऽ ऽ, मला कुणीतरी वाचवाऽ.. मी मेलेऽऽ मला वाचवा.....''

रोहनने मागे वळून पाहिले... एक महिला नदीच्या पाण्यात वाहून जात होती. खडकावर धुणे धुवत असलेल्या महिलांनी आरडाओरडा करायला सुरुवात केली; हे पाहताच, रोहनने क्षणाचाही विचार न करता नदीत उडी मारली. चार-पाच दिवस सतत पाऊस पडत असल्याने नदीच्या पाण्याचा वेग वाढला होता. रोहनच्या नाका-तोंडात पाणी गेल्याने दम लागला होता.... तरी तो घाईघाईने त्या महिलेजवळ पोहोचला. त्याने त्यांच्या हाताला धरले. पण त्या बाई नाकातोंडात पाणी गेल्याने घाबरल्या होत्या आणि पाण्याच्या मुख्य प्रवाहात येऊन वाहत जाऊ लागल्या होत्या. त्यांनी रोहनचे दोन्ही हात पकडण्याचा प्रयत्न केला.

''बाई, माझे दोन्ही हात धरू नका. आपण दोघेही पाण्यात बुडून जाऊ !'' असं रोहन म्हणताच त्यांनी घाबरतच त्याचा एक हात सोडला. रोहनने जोर लावून त्यांना नदीच्या कडेला ओढले. आरडाओरडा करणाऱ्या महिलांनी धावत येऊन त्याला मदत केली आणि त्या महिलेला नदीच्या काठावर आणले. त्या गावातल्याच छायाबाई गायकवाड होत्या. छायाबाई सुखरूप बाहेर आल्याचे पाहून शेजारच्या महिलांना आनंद झाला. त्यांनी छायाबाईंच्या नाकातोंडात गेलेले पाणी काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना खूप जोरात धाप लागली होती. त्या खूप मोठमोठ्याने रडत होत्या. सर्वांनी मिळून त्यांना दवाखान्यात नेण्याचा निर्णय घेतला. छायाबाईंना सर्वांनी हातावर उचलून

दवाखान्यात नेले. बाकीच्या महिला रोहनचे खूप कौतुक करत होत्या.

''अरे रोहन, तू पाण्यात उडी मारली म्हणून गायकवाडाची छाया वाचली.... नाहीतर आज काय तिचं खरं नव्हतं....'' रोहनचे अंग, कपडे चिखलाने भरले होते. ते त्याने पाण्यात स्वच्छ केले आणि घरी गेला.

रोहन आईची स्कुटी घेऊन घरी गेला. अचानक घडलेल्या या घटनेने तोही अस्वस्थ झाला होता. आई-वडील रागावतील म्हणून त्याने घरी कोणालाच हे सांगितले नाही.

हा रोहन म्हणजे राजुरी नवगण या गावातील गजानन विद्यालयाचा १० वीचा विद्यार्थी. अतिशय तरतरीत, उंच असा मुलगा.. वडील रामचंद्र शेतकरी तर आई राधा गावात आरोग्य सेविका म्हणून काम करीत होत्या. रोहनला नदीत पोहायला खूप आवडत होते. पण खेडेगावात खेळासाठी साधने नसल्याने तो बरोबरीच्या मुलांबरोबर खेळत असायचा.





बीडचे सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार डॉ.संजय तांदळे यांच्या कानावर ही घटना गेली. त्यांनी त्यांच्या पत्रकार मित्रांबरोबर चर्चा केली आणि एक दिवस राजुरी नवगण गावात ते सर्व जण आले.

गावात आल्यावर त्यांनी रोहन बहिर कोठे राहतो असे विचारले, तर गावकऱ्यांनी त्याचे घर दाखवले. रोहन घराशेजारीच मुलांबरोबर खेळत होता. डॉ.संजय तांदळे यांनी झालेली घटना समजून घेतली आणि त्याचे कौतुक केले. त्यांनी शाळेचे दप्तर, पुस्तके, पुष्पगुच्छ देऊन त्याचा सत्कार केला. त्याचे आई-वडील घरी आले. त्या दोघांनाही आपल्या मुलाने एका बाईचा प्राण वाचवला याचा खूप आनंद झाला. गजानन विद्यालयाचे प्राचार्य भांगे सरांनीही रोहनचे शाळेत कौतुक केले. बीड जिल्ह्यातील वृत्तपत्रांत रोहनच्या फोटोसह बातमी प्रसिद्ध झाली. सर्व बीड जिल्ह्यात त्याचे कौतुक झाले. बीडमधील अनेक सामाजिक संघटनांनी त्याचा सत्कार केला.

छायाबाई म्हणतात, 'मी केवळ रोहनमुळे वाचले, त्याचे उपकार मी फेडू शकत नाही.' छायाबाईंनी त्याला रु. ५००/- बक्षीस देऊन त्याचे कौतुक केले. ही रक्कम त्याने सामाजिक गणपती मंडळाला दिली आहे.

डॉ. तांदळे यांनी 'पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कारा'साठी खूप प्रयत्न केले आणि २०२३ चा 'पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार' रोहन रामचंद्र बहिरला घोषित झाला. बीडच्या वैभवात त्याने यशाचा तुरा खोवला होता. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते २३ जानेवारी २०२३ ला त्याला हा पुरस्कार विज्ञानभवनात देण्यात आला. त्याच्या आई-वडलांना विमानाने दिल्लीला जाता आले. मोठा होऊन रोहनला डॉक्टर व्हायचे आहे आणि समाजाची सेवा करायची आहे. दुसऱ्यांना मदत करण्याचा संस्कार आई-वडलांनी केला त्यामुळेच माझ्या हातून हे घडले असे त्याने सांगितले.

**संपर्क : ९८८१४१९७९६**

# गुरुजी ते सर...

मनोज बोरगावकर

भाग १०



# कथा सद्‌गुणांची

आमच्या लहानपणी आम्ही सर नाही म्हणायचो शिक्षकांना; गुरुजी म्हणायचो आणि त्या गुरुजींचं 'गुर्जी' झालेलं असायचं. दोन्ही शब्दाचे अर्थ सारखेच, पण किती फरक आहे ना उच्चार करताना!

गुरुजी म्हणताना कसे असे पोटातून म्हणावे लागते... तर सर म्हणताना ओठाच्या वरवर हालचाली केल्या की झालं. अगदी अधर अधर. असो पण त्या वेळच्या गुरुजींच्या आठवणी आजही अगदी ताज्या आहेत. आमची खेड्यातली शाळा. चार वर्ग आणि एकच शिक्षक आणि एक मोठ्ठा हॉल. पहिलीतला मुलगा चौथीत येईपर्यंत त्याला ऐकून ऐकून सगळं तोंडपाठ होऊन जायचे.

गुरुजी शाळा सुटली की आम्हा मुलांमध्ये मूल होऊन खेळायचे. सुट्टीच्या दिवशी गावाशेजारच्या डोंगरावर सगळ्यांना घेऊन जायचे. कोणत्या दगडाखाली साप आहे आणि कोणत्या दगडाखाली विंचू दडलेला असेल हे गुरुजी बरोबर ओळखायचे. डोंगरावरून आम्ही सुसाट सुटायचो आणि खाली आल्यावरही कितीतरी वेळ धावावे लागायचे. फार मजा यायची त्या दिवसांत. या दिवसांत घडलेला एक प्रसंग आठवून गेला आणि तो खूप काही शिकवून गेला.

गुरुजी प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या आईवडलां-सहित आणि आर्थिक परिस्थितीसहित ओळखायचे.... अर्थात तो काळही वेगळा होता. घरी येऊन गुरुजींनी मारलं असे सांगायची हिंमतच नव्हती... तूच काहीतरी चुकला असशील म्हणून घरीपण दोन रट्टे पडायचे. तर असो. एक प्रसंग सांगत होतो मी. आमच्या वर्गात गुरप्पा नावाचा एक मुलगा होता. पिंजारलेले केस... पार मांड्यापर्यंत येणारे ढगळे शर्ट... असा त्याचा अवतार होता. शाळा सुटली की तो जनावरांना चरायला घेऊन जायचा. गुरुजींचं त्याच्यावर विशेष लक्ष असायचं. त्याचे डोके गणितात बेरीज वजाबाकीत भारीच चालायचे. त्याचे लुगडं नेसणारी आज्जी पंधरा दिवसाला एकदा शाळेत यायची चक्क गुरुजींच्या पायावर डोकं टेकवून रडायची अन् म्हणायची ''बापू, तुझ्यामुळे माझा गुरप्पा शाळंत येतंय.. काहीबाही लिव्हतय, माय बाप न्हाईता त्याला... तुझ्याच वट्टीत टाकलंय सांभाळ त्याला.''

असे काही बोलून गुरुजींच्या गालावर हात फिरवून ती आपल्या कानशिलावर कडकडा बोटं मोडायची.

अशीच एकदा गुरप्पाची आजी शाळेत घेऊन आली... आश्चर्य म्हणजे त्या दिवशी गुरप्पाच्या पाठीला दप्तराची पिशवीपण नव्हती. त्या दिवशी ती खूप खूप रडली, ऊस तोडायला जावे लागणार, दोन तीन महिने याला बी घेऊन जाते असे काहीसे आमच्या कानावर आलेले. ती दोघं निघून गेली. आम्ही शाळेत रमलो. पण गुरुजी मात्र अस्वस्थ होते त्या दिवशी. मध्ये एकदा कुठेतरी बाहेरही जाऊन आले.

दुसऱ्या दिवशी गुरप्पा शाळेत आला पण हिरमुसल्या चेहऱ्यानेच. जेवणाच्या सुट्टीत (इंटरवलमध्ये)ही कुठेतरी गायब झाला. तेव्हा आम्ही इंटरवल नाही 'इंट्रोल झाली' असे म्हणायचो!

दुसऱ्या दिवशी गुरुजींनी शाळेत आल्या आल्या

सांगितले की मी आता काही दिवस खोली घेऊन मी इथे गावातच राहणार आहे. तुमच्यापैकी रोज एकाने माझा जेवायचा डब्बा आणायचा. मुले हरखून गेली. गुरुजी आपल्या घरचे जेवणार याचा आम्हांला खूप आनंद झाला. चारही वर्गात मिळून आम्ही शंभर मुलं आणि मुली होतो. सगळ्यांनी आनंदाने एक एक दिवस वाटून घेतला आणि रोज एक एक जण गुरुजींसाठी छान डब्बा आणायला लागलं. आम्हांला वाटायचे गुरुजी आमच्यासोबत बसूनच डब्बा खातील. डब्ब्याचे कौतुक करतील. पण जेवणाची सुट्टी झाली की गुरुजी डब्बा घेऊन त्यांच्या रूमवर निघून जायचे. ज्यांनी डब्बा आणला असेल तो आला की गुरुजींना विचारायचा, डब्बा कसा होता म्हणून? गुरुजी छान होता म्हणून विषय संपून टाकायचे.

हा आम्हां मुलांचा डब्बा आणायचा सिलसिला तीन चार महिने चालला. दिवस संपत गेले. चौथीच्या मुलांना निरोप देताना गुरुजींनी सगळ्यांचे आभार मानले की, 'तुम्ही चार महिने मला इतका छान डब्बा दिलात.. मी रोज पोटभर जेवत होतो.' वगैरे

पण प्रकरण वेगळेच होते, ते आम्हांला खूप उशिरा म्हणजे पाच सहा वर्षांनी कळले. बाहेर गावी शिकायला असलेली आम्ही मुलं सुट्ट्यांत गावी आलो असताना गुरप्पाने ते गुपित आम्हांला सांगितले. तो डब्बा गुरुजी स्वतःसाठी मागवत नव्हते. गुरप्पाची आजी ऊस तोडणीस गेली, त्याची आबाळ होऊ नये म्हणून त्याची शाळा बुडवून त्यालाही घेऊन जाणार होती; पण गुरुजींनी शब्द दिला की गुरप्पाची अजिबात आबाळ होऊ देणार नाही म्हणून. म्हणून गुरुजींनी गावात खोली केली होती. संध्याकाळचे जेवण गुरप्पा गुरुजींकडेच करायचा अन् रात्री तिथेच झोपायचा. गुरप्पाने हे सांगितल्यावर आम्ही आवाक झालो. गुरुजी केव्हाच निवृत्त झालेले. अन्यथा आम्ही सगळ्यांनी शाळेत जाऊन त्यांच्या पायावर डोकं टेकवले असते.

**संपर्क : ९८६०५६४१५४**

## चिंटू

चारुहास पंडित/प्रभाकर वाडेकर



# सप्तरंगी आशा

प्रभाकर साळेगावकर



कुंचल्यात दंग
रंग हे अभंग
चित्राचा तो संग
हवा हवा..।
पाखरांची शाळा
फांदी फांदी वर्ग
किलबिल स्वर्ग
नवा नवा..।
कुणी काढी माळ
कुणी काढी चाळ
कुणी काढी बाळ
रांगताना ...।

चित्रांचित्रांतुनी
घालवू अज्ञान
वाढवू विज्ञान
मनोमनी...।
रंग सारे एक
तिरंग्याच्या रंगी
बख चित्राअंगी
लढावया...।
नव्या शब्द कोशा
रेषा देई भाषा
सप्तरंगी आशा
काळजाला...।

संपर्क : ९४२२२९५३०४

ऐश्वर्य पाटेकर

# ढगू



विपू आज शाळा बुडवून आला होता. तसा तो अधूनमधून यायचाच. आज दंगामस्ती जरा जास्तच झाली होती.

त्यामुळे शाळा सुटायची वेळ केव्हाच होऊन गेली होती. म्हणून त्यास भीती वाटली. तो ढगूला म्हणाला,

''चल, फ्रेंड निघतो मी, घरी जर माहीत झालं नं तर माझी काही खैर नाही.''

''खेळू नं विपू जरा वेळ! आताच तर आला होता तू!''

''काय बोलतोस, अरे सकाळचा आलोय मी! घरी कळलं नं तर आपल्याला पुन्हा कधीकध्धीच भेटता येणार नाही!''

''बरं ठीकंय, उद्या सकाळी मात्र नक्की ये, टप्पा देऊ नकोस!''

दुसऱ्या दिवशी भेटायची हमी देऊन, विपू निघाला. ढगूची अन् विपुची फ्रेंडशिप ही जगावेगळी होती. खरंतर त्याला त्याच्या शाळेतल्या मित्रांना सांगायचं होतं, मात्र ढगू म्हणाला की जर का आपल्या मैत्रीविषयी जगाला कळलं तर मी बरसून जाईन. म्हणजे त्याचं एकापरीने मरणच; त्यामुळे विपुने कुणालाच सांगितलं नाही. त्याला त्याचा हा मित्र गमवायचा नव्हता. किती गोष्टी शिकवल्या ढगूने आपल्याला. त्याच्या पंखावर घेऊन दरी डोंगरातून फिरवलं. एकदा तर उंच आकाशात नेलं होतं. हे माणसाला कुठलं जमतं. तसंही हे अप्रूप जगाला सांगितलं, तर कुणालाही विश्वास वाटणार नाही. विपुला घरी पोहचायला जरा वेळच झाला. आजोबा गोठ्यात मोरवी गाईला चारा टाकत होते. त्याला पाहताच आजोबा म्हणाले,

''आले का विपुलराजे! सुटली तुमची शाळा!''

''हो आजोबा!'' असं म्हणत तो घरात आला. त्याला वाटलं आई रागवेल. मात्र आई काही त्याला रागावली नाही.

''विपू, तोंड हात पाय धुऊन, मस्त गरम गरम शेवयाचा भात खाऊन घे!''

''सूनबाई, जरा जपून जपून पाणी वापरा! दुष्काळ आपलं तोंड दाखवून राहिला. काळ तर मोठा कठीण येईल असं वाटतंय!''

''आजोबा, दुष्काळ म्हणजे हो काय?''

''शेतकऱ्याचं पोट कशावर असतं?''

''शेतातल्या पिकावर!''

''त्या शेतीसाठी पाऊस लागतो. तो जर का नाही पडला तर?''

''शेतीत काही पिकणारच नाही!''

''पिकलंच नाही तर दुष्काळ पडतो.''

असे दिवसांमागून काही दिवस गेले. विपू शाळेत जात राहिला. ढगूला भेटत राहिला. त्याला काही दुष्काळाची झळ पोचली नाही. ती तेव्हाच पोहचली, जेव्हा त्याच्या मोरवी गाईला सोडून द्यायचं ठरलं तेव्हा. दुष्काळाने संपूर्ण गाव हवालदिल झालं. लोक पावसाच्या वाटेकडे आस लावून बसले. पण पावसाचा काही पत्ताच नाही. नाही म्हणायला गावच्या डोंगरावर कधीचा एक ढग येऊन बसायचा; पण न बरसताच परतून जायचा. गावातल्या बऱ्याच लोकांनी गाव सोडलं. जिथे माणसांना खायला काही नव्हतं. तिथे गुराढोरांची काय हालत झाली असेल? म्हणून बऱ्याच जणांनी आपले गाई-बैलं गळ्यात चिठ्ठ्या बांधून सोडून दिले. दुष्काळाने अतिशय उग्र रूप धारण केलं होतं. नेहमीप्रमाणे विपू शाळेच्या वाटेने येत होता. गावातल्या चावडीवर लोकांची गर्दी जमली होती. लोक त्याच्या फ्रेंडविषयीच बोलत होते.

''आरं, हे ढगाड डोंगरावर येतं, जरासं थांबतं न् गळताच निघून जातं!''

''जणू ते शेतकऱ्याची चेष्टा करतंय!''

''पुढच्या आठ दिवसांत पाऊस नाही पडला तर गाव संपलं म्हणून समजा!''

''त्या डोंगरावर येणाऱ्या ढगाचा तपास केला

पाह्यजे!''

विपुला या चर्चेचा धसका बसला. त्याला दुष्काळापेक्षाही त्याच्या मित्राची काळजी वाटू लागली. ढग मलाच भेटायला येतो. हे काही या लोकांना माहीत नाही. आपल्याला आणखी खबरदारी घ्यायला लागेल. तो जेव्हा घरी पोहोचला, तेव्हा त्याच्यापुढे आणखी वेगळंच वाढून ठेवलं होतं. त्याची मोरवी गाय आता त्याच्यापासून दुरावणार होती. गावातले इतर गुरे जशी सोडून दिली; तशी आज मोरवीची पाळी. विपुचे आजोबा मोरवीच्या गळ्यात चिठ्ठी बांधता बांधता म्हणाले,

''गाईला सोडवत नाही, हिच्याच जीवावर आपली शेती झाली!''

''इथे माणसाला माणसाचा जीव जड झाला. तिथं गाईची काय कथा!'' आजी म्हणाली.

विपुला हुंदका फुटला, तो मोरवीच्या गळ्यात पडला. तिचं दावं लावून धरलं, अन रडत रडत म्हणाला,

''नाही आजोबा, आपल्या मोरवीला नाही सोडायचं!''

''विपू, दुसरा कुठलाच पर्याय नाहीये बाळा आपल्याकडे!'' विपूचे वडील म्हणाले

''अरे त्या पोरायला काय समजावीत बसला!'' आजी म्हणाली.

''नाही आजोबा, नाही सोडायचं मोरवीला!''

''याला द्या सोडून त्या गाईबरोबर. नादी कार्ट!'' आजी रागाने म्हणाली.

''अगं त्याला लळा आहे मोरवीचा; वाईट वाटणारच; मी समजावतो त्याला!'' आजोबा म्हणाले.

''इथे माणसाचं खरं नाही, त्याचं काय मनावर घेऊन राहिला?'' आजी रागाने म्हणाली.

''विपू, बाळा पुढच्या दोनचार दिवसांत पाऊस नाही पडला तर आपल्यालाही गाव सोडून जावं लागेल!''

''मग तेव्हा घेऊ नं आपल्या बरोबर!''

''तुला दुष्काळ कळतो का मूर्खा, आपल्याला गाव सोडून जावं लागेल म्हणजे कुणाकडे पाहुणे म्हणून नाही जाणार आहोत!'' वडील चिडत म्हणाले.

''द्या सोडून ती गाय!'' आजी



म्हणाली,

''आजोबा, उद्या जर का पाऊस पडणार असेल तर, तुम्ही नाही नं सोडणार मोरवीला!''

''ढग तुझा काका आहे का? तुझं ऐकायला!'' आजी म्हणाली.

''फ्रेंड आहे तो माझा. माझं नक्की ऐकेल!''

''बरं तो म्हणतो तर आजच्या दिवस रद्द करू!''

''ढग का त्याच्या स्वप्नात येणार का? कायीतरी ऐकता तुम्ही त्याचं!'' आजी.

विपू रात्री अंगणात आजोबाच्या बाजूला, खाटेवर झोपला होता. त्याला बिलकूलही झोप लागत नव्हती. तो सारखा या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. कशी झोप लागेल त्याला कारण उद्यापासून तो त्याच्या फ्रेंडला कायमचा मुकणार होता. पण त्याला आज हीही जाणीव झाली की दुष्काळामुळे जर का गाव इथून निघून गेलं तर तसाही आपल्याला फ्रेंड भेटणारच नव्हता. शिवाय ज्या मोरवीनं आपलं बालपण बहरून टाकलं तिला आपण कायमचे मुकणार! जशी आपली मोरवी गाय तशी इतरांची पण असेल नं त्यांना पण किती वाईट वाटत असेल. आणि माणसांना जर खायला मिळाले नाही तर माणसंही मरून जातील. मैत्रीपेक्षाही ही गोष्ट मोठी आहे.

त्याने पहाटेच गाव सोडलं. अन् डोंगरावर येऊन बसला. ढगू अजून आला नव्हता. विपुला हीपण भीती वाटायला लागली की ढगू जर आला नाही तर! डोंगरावरून दिसणाऱ्या त्याच्या गावाकडे त्याची नजर गेली. फारच कोमेजून गेला होतं गावाचं तोंड. रानोमाळ भेगाळलेली माती. पावसाकडे आस लावून बसलेली भकास शेतीमाती. एवढ्यात ढगूने त्याला पाठीमागून येऊन ''भॉ..'' केलं

''मी घाबरलो होतो ढगू, की तू आज येत नाहीस ते!''

''अरे तू तुझ्या घरच्यांना दिलेलं वचन मी कसं विसरेल?''

''म्हणजे कळलं तुला?'' असं म्हणत विपू रडायला लागला,

''रडतोस काय फ्रेंड?''

''मला फ्रेंड म्हणू नकोस!''

''का पण?''

''मी फार दुष्ट आहे!''

''अरे माझं बरसणं हे माझं मरण आहे. हे मी तुला म्हणालो होतो; मात्र सृष्टी हिरवीगार होते, तेव्हा माझा पुनर्जन्म होतो. हे मी तुला सांगायला विसरलो होतो. विपू तू आता त्या मंदिरात जाऊन बस. मला माझे काम करू दे!'' आवेगाने विपुने ढगूला कडकडून मिठी मारली. जड पावलांनी तो मंदिरात जाऊन बसला.

विजांचा कडकडाट झाला अन् ढगू बरसू लागला. बरसून बरसून ढगूचं अस्तित्व संपलं. विपू मंदिराच्या बाहेर आला. ढगू नाहीसा झाला होता. विपुच्या मनाला किती वाईट वाटलं! दुसरा मार्गच तर नव्हता. त्याने गावाकडे नजर टाकली. सगळीकडे हर्षाची लाट उसळली होती. गाव हिरवं होऊन आलं होतं. विहिरी तुडुंब भरल्या होत्या. नदी खळखळ करत वाहत होती. पाण्याची तळी कुठे कुठे साचून आली होती. झाडे हिरवी झाली होती. विपू आनंदून गेला की आपली मोरवी आता आपल्याला सोडून जाणार नाही. जरा वेळाने भानावर आला तर त्याला ढगूसाठी खूप म्हणजे खूपच वाईट वाटलं..वाटणारच नं त्यांची फ्रेंडशिपच तशी होती. त्याने ढगूला आवाज दिला.. तर झाडांच्या पानांतून, नदीतून, विहिरीतून, खळखळणाऱ्या झऱ्यांतून, हिरव्या झालेल्या मळ्यांतून, ढगूने त्याच्या हाकेला प्रतिसाद दिला. मग तर विपुचा आनंद गगनात मावेनासा झाला..

आपल्या फ्रेंडचा हाच तर पुनर्जन्म...!!

**संपर्क** : ९८२२२९५६७२

अमित डहाणे

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' सप्टेंबर २०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ डिसेंबर २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

# कुतूहल

संपर्क : ९४२१०५०३८८

**१) 'ग्लोबल फायर वॉल' या संस्थेने जाहीर केलेल्या शक्तिशाली देशांच्या यादीत भारत कितव्या स्थानी आहे?**
१) पहिल्या २) दुसऱ्या
३) तिसऱ्या ४) चौथ्या

**२) लॉस एंजेलिसमध्ये होणाऱ्या २०२८ मधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत कोणत्या नव्या खेळाचा समावेश करण्यात आलेला आहे?**
१) बेसबॉल २) क्रिकेट
३) स्क्वॅश ४) वरील सर्व

**३) दूध उत्पादन वाढवण्यासंबंधी कोणती क्रांती भारतात करण्यात आली?**
१) नीळ क्रांती २) गुलाबी क्रांती
३) श्वेत क्रांती ४) सुवर्ण क्रांती

**४) इस्त्रायल – पॅलेस्टाईन युद्धातील भारतीयांना आणण्यासाठी भारताने कोणती मोहीम सुरू केली आहे?**
१) ऑपरेशन अजय २) ऑपरेशन दोस्त
३) ऑपरेशन राहत ४) ऑपरेशन गंगा

**५) इस्त्रोकडून कोणती पहिली मानवयुक्त अवकाश मोहीम २०२४ मध्ये आखण्यात आली आहे?**
१) भारत यान २) गगन यान
३) अवकाश यान ४) उड्डाण यान

**६) 'जागतिक भूक निर्देशांक २०२३' मध्ये भारताचे स्थान आधीच्या वर्षीच्या स्थानाच्या तुलनेने कसे आहे?**
१) घसरलेले २) वाढलेले
३) आहे तसेच ४) निश्चित सांगता येत नाही

**७) वसंत आणि ग्रीष्म हे मराठी ऋतू कोणत्या खालील ऋतूंशी संबंधित आहे?**
१) पावसाळा २) मान्सून
३) उन्हाळा ४) हिवाळा

**८) ६० षटकांचा शेवटचा क्रिकेट विश्वकप कोणत्या वर्षी खेळला गेला?**
१) १९८३ २) १९८७
३) १९९९ ४) १९९२

**९) महाराष्ट्र शासनाने मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देण्यासाठी कोणती योजना २०२३ मध्ये सुरू केली?**
१) भाग्यश्री
२) लेक लाडकी
३) बेटी बचाओ
४) माझी मुलगी माझा अभिमान

**१०) नुकत्याच झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला किती सुवर्णपदके मिळाली आहेत?**
१)१०७ २) २८
३) ३८ ४) ४१

**११) जम्पिंग स्पायडर ही नवी प्रजाती कोणत्या जंगलात आढळून आली आहे?**
१) सिंधुदुर्ग २) नागपूर
३) अमरावती ४) रायगड

**१२) २०२३ चा शांततेचा नोबेल पुरस्कार कोणाला जाहीर करण्यात आला आहे?**
१) युवान फोस २) नर्गिस मोहमदी
३) जोन फोस ४) एलीच्झी एकेमोझी

**१३) २०२१ ते २०३० हे दशक संयुक्त राष्ट्रांने कोणते दशक म्हणून घोषित केले आहे?**
१) पृथ्वी दशक २) हवामान दशक
३) जंगल दशक ४) महासागर विज्ञान दशक

**१४) Statue of Equality असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारताबाहेरील सर्वात उंच पुतळा कोणत्या देशात उभारण्यात आला आहे?**
१) इंग्लंड २) द. आफ्रिका
३) उत्तर अमेरिका ४) रशिया

**१५) आशियाई क्रीडास्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारे अविनाश साबळे कोणत्या क्रीडा प्रकाराशी संबंधित आहेत?**
१) स्टीपलचेस २) कबड्डी
३) धनुर्विद्या ४) लांब उडी

## सप्टेंबर २०२३ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (ऑगस्ट–सप्टेंबर २०२३) यशस्वी स्पर्धक

कु. अनिकेत भवार, कु. प्रणव दाभाडे, कु. प्रियंका पाटील, कु. साक्षी पाईकराव, कु. अर्णव मंत्री, कु. शर्वरी चांडक, कु. सुवीर फडे, कु.प्रसाद सरोदे

## कुतूहल (सप्टेंबर २०२३) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) –३ | २) – ४ | ३) –३ | ४) –१ | ५) – ३ |
| ६) –१ | ७) –३ | ८) –१ | ९) – १ | १०) –१ |
| ११) – २ | १२) –२ | १३) – २ | १४) – १ | १५) –३ |

## चित्रकोडे (ऑगस्ट–सप्टेंबर २०२३) यशस्वी स्पर्धक

**पुणे** – कु. शरण्या थिटे, कु. अर्चित फाकटकर, कु. सई गोते, कु.यश गोते, कु. वल्लभ ढमढेरे,कु. सागर जाधव, कु.कार्तिक उत्तर्डे, कु. अनिकेत भवार, कु. दिशा घोरपडे

**सातारा** – कु. श्रावणी अहिवळे, कु. आरती तरंगे, कु. शौर्य सरगडे, कु. सुवीर फडे, कु. समीक्षा करे, कु. श्रेया जाधव, कु. श्रुती राजगे, कु. अनुष्का सुळे, कु. सृष्टी राजगे,

**सांगली** – कु. शांभवी कुलकर्णी, कु. धृव खाडिलकर, कु. मन्मथ जेऊर, कु. दिशा जाधव,

**अमरावती** – कु. सपना बाकोडे, कु. काजल बाकोडे, कु. संजना बाकोडे, कु. चिराग धंदरे, कु. गुरू धंदरे, कु. रणवीर ठाकूर, कु. आराध्या वानखडे, कु. सोनू वानखडे, कु सुहास वानखडे, कु. सुवर्णा वानखडे, कु. अश्विनी वानखडे, कु.श्रेस्ती नळकांडे,

**ठाणे** – कु. श्रुती परांजपे, कु. पुर्वेश खैरनार

**अहमदनगर** – कु. स्वरदा गायकवाड, कु. स्वरूप पारासूर,

**नाशिक** – कु. धानिका बेंडकोळी, कु. रत्ना महाले, कु. सिद्धांत परदेशी, कु. राजेश्वरी परदेशी, कु. माधुरी परदेशी, कु.ज्ञानेश्वरी परदेशी, कु.शिवम परदेशी, कु.शिवन्या परदेशी, कु.वेदांत परदेशी, कु.सूरज गावीत, कु.मेघा परदेशी, कु.निखिल गोधावणे, कु.साई गोधावणे, कु.आराध्या परदेशी, कु.आस्था परदेशी, कु.सोनाक्षी वाघ, कु.कल्याणी नाईक, कु.विराट परदेशी, कु.कुणाल वाघ, कु.कार्तिक सुर्यवंशी, कु.रुद्र परदेशी, कु.श्लोक परदेशी, कु.श्वेता नाईक, कु.यश वाघ, कु.ईश्वरी परदेशी, कु.सार्थक परदेशी, कु.स्वरा परदेशी, कु.अलोक परदेशी, कु.अन्वी गायकवाड, कु.साई परदेशी, कु.उत्कर्षा परदेशी, कु.स्वरा वाघ

**बुलढाणा** – कु. आरती पाचखंडे, कु. सिद्धी तिरके, कु. प्रसाद पाटील, कु. साक्षी सरदार, कु. पूजा कांडेलकर, कु.प्रसाद सरोदे

**जालना** – कु. कार्तिक ठोंबरे, कु. जारा शेख

**सिंधुदुर्ग** – कु. ईश्वरी कांबळे, कु. एकनाथ गुरव, कु. अर्श रमदुल, कु. शुभ्रा सावंत, कु. महंमद अलवी, कु. शमिका राऊत, कु. नाजमिन ठाकूर, कु. राहूल कदम, कु. जिनत शेख, कु.नवाज जैतापकर, कु. सुबहान मुजावर, कु.सुफयान मुजावर, कु. सार्थक तेली, कु. इम्रान रमदूल, कु. श्रावणी पवार, कु. तनिष्का पाटणे, कु.हर्षिद बेलणेकर, कु.आर्शिया जैतापकर, कु. शौर्य शेलार, कु. वेदा राऊत, कु. युक्ता पाटील, कु. अन्सार रमदूल, कु. आझाद रमदूल, कु. सिदरा मुजावर, कु.सारा रमदूल, कु. सिदीका, कु. धनश्री धुरी, कु.वासंती धुरी

**कोल्हापूर** – कु. आर्या बामणे, कु. प्रियांका पाटील, कु. शौर्य माळी

**रत्नागिरी** – कु. सुमुख केतकर

**धुळे** – कु. यामिनी गोसावी, कु. मोनाली गुजर,

**वर्धा** – कु. टिना मेंदुले

**नांदेड** – कु. साक्षी पाईकराव, कु. गफार फाजलाणी, कु. जिक्रा शेख, कु. जैद शेख

**बीड** – कु. राधिका बनसोडे, कु. शुभम पडोळे, कु. समाधान ननवरे, कु. आयशा पठाण, कु. पुनम पडोळे, कु. साक्षी घुले, कु. सृष्टी पडोळे, कु. सिद्धी घुले,

**परभणी** – कु. अर्णव मंत्री, कु. शिवम देशमुख

**मनमाड** – कु. समर परदेशी

**नागपूर** – कु. सिद्धांत जामकर

**गडचिरोली** – कु. अंश अंबादे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हालाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हाला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



मी माझ्या पप्पांबरोबर बाजारात खरेदी करण्यासाठी गेलो होतो. खरेदीच्या वेगवेगळ्या वस्तू घेतानाच पप्पांनी घरात मिसळ करण्यासाठी दोन ब्रेडच्या पेट्या खरेदी केल्या होत्याच. घराकडे परत येत असताना जवळच असणाऱ्या मैदानावर दोन कुत्र्यांची पिल्ले अन्नाच्या शोधासाठी इकडेतिकडे भटकत होती. मी पप्पांना गाडी थांबवण्यास सांगितली. आम्ही गाडीवरून उतरताच ती पिल्ले अपेक्षेने आमच्याकडे पहात होती. मला त्या दोन्ही पिल्लांच्या डोळ्यात भूक दिसली. मी पप्पांना विनंती केली यांना आपण खायला देऊया. पप्पांनी हसतच या गोष्टीला परवानगी दिली. माझ्या हातात पप्पांनी अखंड एक ब्रेडची पेटी सोपवली. मी मागचा पुढचा विचार न करता त्यातील स्लाईस वेगळे केले. एका पिल्लास सहा आणि दुसऱ्या पिल्लास सहा स्लाईस अशी वाटणी करून त्यांच्या समोर ठेवली. त्यांनी काही मिनीटांत ब्रेडच्या स्लाईस संपवल्या. त्यांचे पोट भरले होते. शेपूट हलवून त्या पिल्लांनी मला आणि पप्पांना 'थँक यू' ची खूण केली. घरी गेल्यानंतर तिखट मिसळ ही आम्हांला गोड लागली. पप्पांनीही यापुढेही अशीच गोड कामे करीत जा असा आशीर्वाद दिला. माझ्यातल्या चांगुलपणाला हे खूप मोठे बक्षीस मिळाले होते.

**अंश संजय सौंदलगे**
इयत्ता ३ री, फडणीस विद्यालय, कुरुंदवाड,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर–४१६१०६



दिवाळीत मी गावी गेलो होतो. माझ्या गावाजवळून एक नदी वाहते. मी आल्याबरोबर नदीवर जात होतो तेव्हा मला रस्त्याच्या बाजूला एक कष्टकरी दिसला. माझ्या एवढाच मुलगा भाता फिरवत होता आणि तो कष्टकरी तापलेली कुऱ्हाड हातोड्याने ठोकत होता. मी हे पहिल्यांदाच बघत होतो. म्हणून मी त्यांच्याजवळ गेलो त्यांची चौकशी केली असता ते १५ कि.मी अंतरावरून आले होते असे समजले. मी त्यांचा भाता फिरवून बघितला. ऐरण, हातोडा यांची माहिती घेतली. पण मला त्यांच्याजवळ खाण्यासाठी काही दिसले नाही. मी घरी आलो आणि तडक स्वयंपाकघरात गेलो. माझ्या हाताने एका पिशवीत लाडू, चकल्या, शेव, शंकरपाळी, चिवडा भरला आणि माझ्या आतेबहिण, भावाला घेऊन तिकडे गेलो व फराळाची पिशवी त्या मामांच्या हातात दिली. त्यांना फार आनंद झाला. तो दिवस दिवाळीचा होता. घरी आल्यावर आजीने विचारले कुठे गेला होतास? मी आजीला सर्व खरे सांगितल्यावर तिलाही आनंद झाला.

**कु. सक्षम महेंद्र सरपाते**
इयत्ता – ४ थी, दौलत ५५/३, सुंदरखेड, काँग्रेसनगर,
ज्ञानदीप शाळेजवळ, चिखली रोड, बुलढाणा–४४३००१



रविवारचा दिवस होता. मी सकाळी ६ वाजता उठलो. अंघोळ केली. माझा नाष्टा झाला. माझी मम्मी घरातील कामे लवकर उरकत होती, कारण तिला आमच्या शेतात पावटा तोडायला जायचे होते. मी पण माझे उरकून खेळायला गेलो. माझी मम्मी पावटा तोडायला शेतात गेली. तिने दुपारपर्यंत पावटा तोडला. मग मम्मी घरी आली. दुपारी पप्पा कंपनीतून घरी आले. पप्पांनी शेतात तोडलेला पावटा घरी आणला. मम्मी व पप्पांनी तोडलेला पावटा निवडून पोत्यात भरला. नंतर मम्मीने जेवण तयार केले. आम्ही जेवण केले. जेवण झाल्यावर पप्पा व मम्मीने पावटा विकायला सासवडच्या बाजारात गेले. मी आणि माझा लहान भाऊ घरीच होतो. मम्मीला शेतातल्या कामामुळे घर आवरायला वेळच भेटला नाही म्हणून मी ठरवले की आज आपणच घर आवरायचे. मग मी घर आवरायला सुरुवात केली. मी घरातल्या कपड्यांच्या घड्या घालून त्या नीट ठेवल्या. दुपारी जेवण केलेली सगळी भांडी एका टबात गोळा करून ठेवली. माझ्या लहान भावाची इकडेतिकडे पडलेली खेळणी गोळा करून एका बॉक्समध्ये ठेवली. सगळे घर मी झाडून घेतले. सगळी फरशी पुसून स्वच्छी केली. सगळे काम झाल्यावर मी मम्मीला फोन केला आणि म्हणालो, मम्मी, तू घरी किती वाजता येशील? मम्मी म्हणाली, संध्याकाळी सात वाजता मी घरी येईल. मग मी म्हणालो, तुला एक गंमत दाखवायची आहे. मम्मी म्हणाली, काय आहे गंमत? मी म्हणालो, तू घरी आली की तुला गंमत दिसेल. सासवडच्या बाजारात पावटा विकून पप्पा-मम्मी रात्री सात वाजता घरी आले. मग मी दार उघडले. बघतात तर काय घर सगळे स्वच्छ होते. मम्मी, पप्पा म्हणाले, घर कुणी स्वच्छ केले? मी म्हणालो, मी केले. मी केलेल्या कामामुळे मम्मीपप्पांना खूप आनंद झाला. त्यांनी माझे कौतुक केले. आपण सगळ्यांनी आपल्या आईवडीलांना कामात मदत केली पाहिजे.

**कु. रुद्र रवींद्र कादबाने**

इयत्ता - ४ थी, जि.प.प्रा. शाळा खळद, ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१



उन्हाळ्याचे दिवस होते. आमचा तास चालू होता. खूप ऊन तापले होते. म्हणून आम्ही फॅन चालू केला. दुपारचे १ वाजले होते. तेवढ्यात खिडकीतून एक चिमणी आली व फळ्यावर बसली आणि तिला बाहेर जायचे होते म्हणून ती उडू लागली. तिला फॅनचा थोडासा धक्का लागला व ती ओट्यावर जाऊन पडली. मग मी पटकन माझ्या पिण्याच्या बाटलीचे झाकण उघडले व तिला झाकणात पाणी दिले व माझी मैत्रीण शिवज्ञा हिने तिला खाऊ घातले. मग आम्ही त्या चिमणीला छोट्या झाडावर बसवले. ती थोड्या वेळानंतर उडून गेली. आम्हां सर्वांना खूप आनंद झाला. आमची ५ वाजता शाळा सुटली. मग आम्ही शाळेतून घरी आल्यावर माझ्या आजोबांना ही शाळेतली सगळी घटना सांगितली व मला माझ्या आजोबांनी मला शाबासकी दिली. प्राणीमात्रांवर अशीच दया करा अशी प्रेरणा दिली.

**माधुरी नंदू परदेशी**

इयत्ता चौथी, जि.प.प्रा. शाळा हट्टी, ता. चांदवड जि. नाशिक-४२३११७

उमलती प्रतिमा

## चंद्रयान

भारत माझा देश महान, सोडले त्याने चंद्रयान.

जगात होईल भारताची शान
जेव्हा पोहोचेल चंद्रयान.

इस्रोच्या वैज्ञानिकांचा मला अभिमान
त्यांनी यशस्वी केले हे अभियान .

जेव्हा उतरेल चंद्रयान वाढेल साऱ्या जगाचे ज्ञान.

होमी भाभा, अब्दुल कलाम
हेच तर आहेत आमचे प्रेरणास्थान.

विज्ञानाची कास धरू जगात भारताचे नाव करू

राखू तिरंग्याचा मान
गर्वाने गाऊ राष्ट्रगान.

कु.अन्वया वैशाली निलेश पाकदुणे
इयत्ता-४ थी (क) बाल शिवाजी प्राथमिक शाळा
जठारपेठ, अकोला

## शाळा

ज्ञानाचा सागर म्हणजे शाळा
संस्काराचा गोड झरा म्हणजे शाळा
व्यक्तिमत्त्व विकासाचे वेगळे वळण म्हणजे शाळा
मौज मस्तीचा वेगळाच थाट म्हणजे शाळा

कोपऱ्यातील प्रयोगशाळा आणि ग्रंथालय म्हणजे शाळा
रोजचा रंगीत फळा म्हणजे शाळा
एक ठोका, दोन ठोके तर टणटण वाजणारी घंटा म्हणजे शाळा
मैत्री आणि भांडणाची जोड म्हणजे शाळा

सकाळची प्रार्थना आणि दुपारचा भात म्हणजे शाळा
पाठीवर दप्तर आणि अंगात गणवेश म्हणजे शाळा
प्रत्येक विषयाचा एक नवा अंदाज म्हणजे शाळा
शिक्षकांच्या हातातील छडी म्हणजे शाळा

उत्तुंग जगाकडे बघणारी केविलवाणी नजर म्हणजे शाळा
उरात साठवलेली असंख्य स्वप्ने म्हणजे शाळा
आयुष्याच्या वळणावरच गोड स्वप्न म्हणजे शाळा
अशी माझी शाळा, अशी माझी शाळा...

कु. आरती विनोद जाधव
इयत्ता ८ वी, जि.प.प्रा. शा. उमरद (खालसा), ता. जि. बीड



कु. गायत्री विलास वरईकर
जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा, खंडाळा, अकोला ४४४१०३



कु. आयुष गुरुनाथ नाईक
जि.प.प्रा. शाळा, सरमळे देऊळ, मु. पो. सरमळे,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५११

# माझ्या भिमा

माझ्या भिमा रं, माझ्या देवा रं...
झालास तू आमचा सहारा रं...
कोठे नव्हता हो आम्हां मान
जन्म घेतला या भिमानं...
त्याचा निश्चय नव्हतां लहान
मी समाजात मिळवीन मान...
शिकताना भोगला लयं त्रास
शिकून झाला मोठा माणूस...
दिला मान त्यानं मिळवून
सारे लोक जगती अभिमानानं...
आयुष्यभर राहिलं त्याचं नाम
सारे जल्लोष करीती जय भिम...

**विराज विठ्ठल झोरे**
इयत्ता- ६ वी, जि. प. प्रा. शाळा सरमळे, देऊळ,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५११

# ठिपके

काळ्या आभाळात
अनेक ठिपके
त्याच्यामध्ये एक
मोठा ठिपका
कोणी म्हणे चंद्र,
कोणी म्हणे चांदोबा
मी तर म्हणतो
त्याला चांदोमामा
आता तुम्ही म्हणाल
ते ठिपके कसले
त्याला म्हणतात चांदणे
आता तुम्ही म्हणाल
चंद्रावरचे डाग कसले
मला पण माहीत नाही कसले

**विराज महेंद्र लव्हाळे**
इयत्ता २ री, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मराठी मुले,
ता.जामखेड जि.अहमदनगर मु.पो.जामखेड-४१३२०१



कु. आयुषी पोरेडी
इयत्ता ७ वी, आनंदक्षण विद्यालय, पुणे-४११०५१




कु. रुद्र जोशी
इयत्ता ८ वी, श्री श्री रवीशंकर विद्या मंदिर, पुणे-४१२११५

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क : ९८२३४१३६२९




चला लवकर येथून नाहीतर ते लोक पकडतील
बापरे! आता हा तात्या कुठं गेला? पळाला की काय...
थांबा
बाहेर माझा मित्र आहे हे लोक त्यालाच पकडतील
त्या लोकांनी तुम्हांला का बांधून ठेवलं होतं? काय प्लॅन आहे त्यांचा?
तितक्यात...
तर तू आहेस तो मुलगा, थांब...
क्रमशः

# जंगल एक्सप्रेस

हेमंत नारायण जोशी

माणसांची ट्रेन एकदा
जंगलात घुसली
जंगल एक्सप्रेस समजून
माकडं आत बसली
जिराफाची मान काही
डब्यामध्ये जाईना
पक्षी सारे टपावर
त्यांची किलबिल राहिना
लबाड लांडग्याने तेव्हा
अडवली एक सीट
कोल्ह्याने फाडून टाकले
सशाचे हाफ तिकीट
साहित्याची वरची जागा
मुंगसाने पकडली
हत्तीची सोंड मात्र
दारामध्ये अडकली
इंजिनावर कावळा बसला
कोकिळेनं घेतली तान
मुंगी आली शोधत
तिच्या साखरेचं स्थान
हरणांसह भांडत भांडत
काळवीट दोन चढले
लांडग्याच्या डब्यांतले सीट
पाहून त्यांचे चेहरे पडले
खारूताईनं एंट्री अगदी
खिडकीतूनच घेतली
सिंहाजवळची सशाची सीट
त्याच्या जिवावर बेतली
कुणाला अंदाज येईना
सिंह म्हणाला सशाला
सोड माझी जागा
नाहीतर खाईन तुला
वाघाच्या डरकाळीने
सर्वांनी दचकून पाहिलं
गार्ड झालेलं गाढव
स्टेशनवरच राहिलं !!!

संपर्क : ९८८१७१८६५१



# My Unique Journey



Sarvagya Patil


3rd std., Pawar Public School,
Kandivali, Mumbai

**PLANET SARVADHNYA**

I am Sarvagya. It is 2035, and today is my 20th birthday. At night 8'o clock, I wanted to launch my Spaceship, which my friend had given me as a birthday gift. I named my spaceship "KANAD", an Indian great scientist and philosopher. I planned to visit Mars but saw a portal, so I went through it.

I saw a colourful planet. Its name was Sarvadhnya, meaning Sarvadhnya knows everything. Oh! What a coincidence that my name is also the same meaning.

I saw AIs that can drink turmeric milk and eat Roti Sabji. Tiny chips were transformed into houses when thrown on the ground. On planet Sarvadhnya I met one boy whose name was Aaryabhatt. Aaryabhatt was very intelligent. who could make any Robot in just 15 seconds? Aaryabhatta told me that everyone on our planet is so intelligent. There is no



separate country here. There is no war here. Everyone on this planet considers this.

The planet is their home, and strives to keep our world more beautiful.

There was everything that would happen on Earth after 300000 years!

I came to my research centre. I looked at the calendar, and a century had changed on Earth. I was missing my Earth. I wanted to return to my home. I expressed my heart's desire. At that time, Aaryabhatt also wanted to see Planet Earth.

We both boarded my Kanad spaceship. Throughout the journey to Earth, I taught Aaryabhatt about Indian food, Indian Culture and my mother tongue Marathi.

Earth has changed a lot now. The year 3075 began here. But surprisingly, today was only my 23rd birthday, which I was celebrating with my new friend.

Now we both live happily someday on earth and eventually on planet Sarvadhnya.

**NEW JOURNEY AT BANK OF RIVER GANGA**


It had started to snow falling on planet SARVADHNYA. So, Aaryabhatta and I decided to come and stay on Earth for a few days. Aaryabhatta started liking our planet Earth. He came here every time with me when I was planning to visit my home planet. He was studying here the atmosphere and history of the Earth. On this trip, he wanted to see all rivers of India. Then we started it from the holy river Ganga. I told him the story of the origin of the Ganga in Hindu myth. I also told him about the importance of the river Ganga in India.We landed our spaceship in the water of the river Ganga.By now, our spaceship had turned into a submarine. What a surprise! A vibrant civilisation existed in the river Ganga's bed. I studied this kind of civilisation in Grade 7, which lived on Earth about 8000 years ago. We thought this civilisation was over, but we were wrong. This civilisation stood in the limelight today.

Aaryabhatta was lost seeing this. We sent our robot out to study that Civilisation. The robot learns that the peace-loving people are fed up with the increasing wars on Earth and have settled down at the bottom of the river. Aaryabhatta and I decided to meet those people. We didn't have language barrier because our robot knew every old and new language on the planet as many as there are planets in the universe. They told us about their building technology, their language, their food culture, and the machines they made. They were so advanced that they recognised the importance of water even while living in the river bed. They had a water-saving drainage system. They dug wells at the bottom of the river.

They also teach us how to swim at the bottom of the deep water without any help. This civilisation was a part of the Indus Valley civilisation itself. The oldest and most advanced civilisation on Earth, which guided the future people right direction. Aryabhatta was very impressed by meeting this civilisation. Although his planet was very advanced compared to Earth, it did not have such a legacy of ancient history. But I was very proud of this.Aryabhatta felt that the legacy of this ancient culture should be brought to his planet. Their buildings, sewage system, earthen toys, ornaments, utensils, and cosmetics should be known to the

Sarvadhnya planet's inhabitants.The king of the Ganges civilisation liked Aryabhatta's idea and accepted Aryabhatta's invitation.The king wished to send us the best engineers, artists, linguists, writers, painters and philosophers from his court.We decided to take them with us and leave for the planet Sarvadhnya. But, after living underwater for thousands of years, their body structure became like aquatic animals.We started training them to stand on the ground. We brought them to the floor for an hour every day when the whole town was asleep at night, the men of the Ganges civilisation, who were inherently very intelligent and adaptable to every situation, could easily stand on the ground with little effort. And now we were all ready for our next journey.Now a new era was about to begin on the planet Sarvadhnya. And our Indus Valley civilisation would be immortalised in the whole universe.


**Contact : 9920898979**



# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

Please help the hungry rabbit to reach the carrot.



Find out the 10 differences in the following two pictures looking alike.






# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ डिसेंबर २०२३.

३) कोड्याचे उत्तर जानेवारी २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

**Registered** R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.11.2023 Posting on 27th & 28th November 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53















**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड










किंमत प्रत्येकी
₹ १६३/-
(५०% सूट)







**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-**

किशोर


**If not delivered please return to :**
संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,